संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

₹ 3000* पर्यंत डिस्काउंट

₹12000* पर्यंतचे विशेष फायदे (स्कूटर्सवर)

कमी डाउन पेमेंट ₹ 1999*

निवडक कार्ड्सवर कॅशबॅक ₹5000*

शुभ मुहूर्त ऑफर्स अनलॉक करण्यासाठी स्कॅन करा

98980 51581

रजि नं. १६४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १६.१०.२०२४ | अंक नं. १९२ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

पोलिस असल्याची बतावणी करत पुजाऱ्याला स्टेशन रोडवर भरदिवसा चार लाखांना लुटले

नगर – पोलिस असल्याची बतावणी करत दोघा भामटयांनी लालटाकी येथील खाकिदासबाबा मठाच्या पुजाऱ्यास नगर शहरातील वर्दळीच्या स्टेशन रस्त्यावर क्लेरा ब्रूस हायस्कूल समोर भुरळ पाडत सुमारे ४ लाखांना लुटल्याची घटना मंगळवारी (दि.१५) सकाळी १०.३० च्या सुमारास घडली आहे.

याबाबत पुजारी विजयशंकर मुलचंद मिश्रा (वय ६९, रा. सुपद्रानगरजवळ, अरणगाव रोड) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे लालटाकी येथील खाकिदासबाबा मठाचे पुजारी असून अनेकांकडे ते पूजेसाठी जात असतात. मंगळवारी (दि.१५) सकाळी ते शैलेश जाजु यांचे रुपाली एजन्सी, तापकिर गल्ली, अहिल्यानगर या होलसेल विक्रीचे दुकानात पुजा करण्याकरीता जात असताना सकाळी १०.३० च्या सुमारास क्लेरा ब्रूस मैदानाचे समोरील रस्त्याचे गतिरोधकवर २ अनोळखी इसमांनी फिर्यादीचा पाठलाग करुन त्यांना थांबवले. आपण पोलीस असल्याची बतावणी केली व फिर्यादीस भुरळ पाडुन त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन व रुद्राक्ष माळ त्यावर बाजूने सोन्याची टिकली असलेली माळ तसेच उजव्या हातातील खडयाच्या चार अंगठया काढण्यास लावून स्कुटरमधील पिशवीत ठेवण्यास सांगितल्या. फिर्यादी मिश्रा यांनी त्या दोघांनी सांगितल्याप्रमाणे सुमारे ४ लाख रुपये किमतीचे दागिने त्यांच्या गाडीच्या डिक्कीत ठेवले. त्यावेळी त्यांना बोलण्यात गुंतवून या दोघांनी त्यांची नजर चुकवून ते सोने काढून घेवून कागदात चार दगडी खडे ठेवले व तेथून निघून गेले.

काही वेळाने त्या दोघांनी आपल्याला फसवून लुटल्याचे फिर्यादी मिश्रा यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात दोघा भामटयांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २०४, ३१८ (४), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास महिला स.पो.नि. योगिता कोकाटे या करत आहेत.

रात्रीच्या वेळी घरातून चोरी मोबाईलसह रोकड लंपास

नगर – रात्रीच्या वेळी घरात घुसून अज्ञात चोरट्यांनी उचकापाचक करत कापडी पर्समध्ये ठेवलेली रोकड, मोबाईल फोन व एटीएम कार्ड असा एकुण २५ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना सावेडी उपनगरातील श्रीराम चौक परिसरात घडली. याबाबत मोहिनी किसनराव पालवे (रा. श्रीराम चौक, अहिल्यानगर) यांनी मंगळवारी (दि.१५) सायंकाळी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. घरफोडीची ही घटना १२ ऑक्टोबरला रात्री ११.४५ ते पहाटे ३.३० या कालावधीत घडली आहे.

त्या दिवशी फिर्यादी जेवण करुन घरात झोपी गेल्या असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराच्या आत प्रवेश करुन घरातील सामानाची उचकापाचक केली. घरातील कापडी पर्समध्ये ठेवलेले ४ हजार ५०० रुपये रोख रक्कम व मोबाईल फोन व एटीएम कार्ड असा एकुण २५ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५, ३३१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

खासगी प्रवासी बसच्या तिकीट दरांमध्ये दिवाळीच्या तोंडावर मोठ्या प्रमाणात वाढ

तक्रार करण्यासाठीचे संपर्क क्रमांक मात्र बंद, प्रवाशांची लूट कधी थांबणार? शासनाला प्रश्न

नगर – दिवाळीच्या आगमनापूर्वी खासगी प्रवासी बस चालकांकडून पुन्हा तिकिट दरांमध्ये वाढ करत प्रवाशांची लूट झाली आहे. सुट्टयाचे आणि सण यांच्या काळात प्रवासासाठी अधिक तिकिट दराचा भुर्दंड भरावा लागणारच, अशी धारणा सर्वसामान्यांची झाली आहे. वर्ष २०१८ मध्ये राज्य शासनाने आदेश काढला आणि प्रवासी बसचे तिकिटदर निश्चित केले. परंतु ६ वर्षे होऊन गेली परिस्थिती 'जैसे थे' आहे. आदेशात अधिक तिकीटदर आकारणाऱ्या खासगी बस चालकांच्या विरुद्ध तक्रार करण्यासाठी (०२२) ६२४२६६६६ आणि १८००२२०११० हे दोन संपर्क क्रमांक दिले होते. ते सध्या बंद स्थितीत आहेत. ते बंद का आहेत ? हे म्हणजे प्रवाशांना 'तोंड दाबून बुक्क्याचा मार' दिल्यासारखे आहे. ही प्रवाशांची लूट केव्हा थांबणार, असा प्रश्न हिंदु जनजागृती समितीच्या 'सुराज्य अभियाना'चे महाराष्ट्र राज्य समन्वयक अभिषेक मुरुकटे यांनी केला. या संदर्भात एक निवेदन महाराष्ट्र राज्य परिवहन आयुक्तांना यांना दिले त्या वेळी ते बोलत होते.

काही प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी तक्रार करण्यासाठी व्हॉट्सॲप हेल्पलाइन क्रमांक जाहीर केले खरे; पण आयुक्त कार्यालयाने असे करण्यासाठी आदेश निर्गमित केले असल्यास, अन्य प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी असे क्रमांक का जाहीर केले नाहीत? जेव्हा आम्ही परिवहन अधिकाऱ्यांची भेट घेऊन अधिक तिकिट दर आकारणाऱ्या खासगी बस चालकांविरुद्ध काय कार्यवाही केली, असे विचारले, त्या वेळी 'आमच्याकडे तक्रारीच आल्या नाहीत' असे उत्तर मिळाले. जर तक्रारीसाठीचा क्रमांकच बंद आहे, तर तक्रारी येणार कशा? अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हायला हवी. तसेच हे संपर्क क्रमांक तत्काळ चालू करून ते २४ तास चालू रहायला हवेत, असेही निवेदनात म्हटले आहे.

याविषयासह 'ॲप' आणि 'वेब–बेस्ड ग्रीगेटर्स'वर देखील नियंत्रण यावे, या दृष्टीने 'महाराष्ट्र रेग्युलेशन्स ऑफ एग्रिगेटर रूल्स २०२२' तयार करण्यासाठी प.प.२०२३ यादिवशी समिती गठित केली, परंतु अद्यापपर्यंत या समितीकडून अहवालच सादर झालेला नाही. तो कधी सादर करणार आणि त्याची अंमलबजावणी कधी होणार? या दिरंगाईचा प्रवाशांवर किती परीणाम होत असेल? याचा शासन केव्हा विचार करणार आहे? 'सुराज्य अभियान'ने या आधी अनेकदा परिवहन विभाग आणि राज्य शासनाकडे पत्र, ई–मेल, आणि ट्विटरच्या माध्यमातून तसेच प्रत्यक्ष भेटून संवाद साधला आहे. तरीही बराच काळ लोटूनही प्रश्न अनुत्तरितच आहेत आणि प्रवाशांची लूट सुरूच आहे.

पाचवे
|| पुण्यस्मरण ||

"तुमचे चिंतन, तुमच्या स्मृति, आम्हाला त्याचा आधार... आमच्या प्रत्येक आचार-विचारात तुमच्या प्रेरणेचा अधिष्ठार.."

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली

स्व. ज्ञानदेव (नाना) राक्साहेब रासकर
स्व. दि. १७/१०/२०१९

* दुःखांकित *

समस्त रासकर परिवार

* हॉटेल पर्वत – लॉंजिंग ॲण्ड परमिट रुम, सहकार सभागृहामागे, अ.नगर.
* हॉटेल राऊ – लॉंजिंग, बियर शॉपी ॲण्ड चायनीज सेंटर, महात्मा फुले चौक, अ.नगर.
* हॉटेल कोमल चायनीज – आनंदधाम चौक, अ.नगर

नगरमधील पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादी अजित पवार गटात पक्षप्रवेश

नगर – पारनेर नगर विधानसभा मतदार संघात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठी फिल्डिंग लावली असून पारनेर आणि नगर तालुक्यातील बड्या नेत्यांच्या हातात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे घडयाळ बांधले आहे. बुधवारी (दि.१६) मुंबईत या नेत्यांचा पक्ष प्रवेश झाला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी शरद पवार गटापुढे या निवडणुकीत तगडे आव्हान उभे करण्याचे अजित पवार यांचे मनसुबे स्पष्ट झाले आहेत.

पारनेरमधील पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केला त्यावेळी त्यांचे स्वागत करताना पक्षाध्यक्ष अजित पवार.

पारनेरचे माजी नगराध्यक्ष विजय सदाशिव औटी, धनगर समाजाचे नेते शिवाजीराव गुजर, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुजित झावरे, माजी बांधकाम सभापती भास्करराव उचाळे, निघोजचे सरपंच सचिन बराळ पाटील आदी उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला या पक्ष प्रवेशामुळे बळ मिळाले आहे. या पक्षप्रवेशाची अधिकृत माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतः ट्वीट करून देत या पदाधिकाऱ्यांचे पक्षात स्वागत केले आहे.

काशिनाथ दाते, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे आदी नेत्यांनी आपल्या समर्थकांसह जाहीरपणे राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे.

यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, माजी राज्यमंत्री अशोकराव सावंत, युवक तालुकाध्यक्ष

चौथे पुण्यस्मरण

स्व. विजय यशवंत कंगे
स्व.दि. १७/१०/२०२०

आठवण तुम्ची प्रत्येक क्षणाला, व्याकुळ करते आम्च्या मनाला.. आज जरी नाही तुम्ही आमच्यात, सदैव राहतील तुमच्या आठवणी आमच्या मनात..

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!

* शोकाकुल *
श्रीमती स्नेहलता विजय कंगे
डॉ.विवेकानंद यशवंत कंगे — राजेंद्र यशवंत कंगे
सौ.स्मिता आशिष धामणेकर — आशिष निळकंठराव धामणेकर
प्रमोद विजय कंगे — सौ.शर्मिला प्रमोद कंगे
यश, आरोही

समस्त कंगे परिवार.

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999

Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite

सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

चंद्र आहे साक्षीला– परिपूर्णतेचा अनुभवाला

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

भारतीय संस्कृतीत पौर्णिमा ही संकल्पना पूर्णत्व या अर्थाने उपयोगिली आहे. कोजागिरी पौर्णिमा म्हणजे तर संपूर्ण परिपूर्णतेचा सौंदर्यदायी कळसच जणू!

अपूर्णतेकडून पूर्णतेकडे झेपावणे हीच जीवनाची वाटचाल. तर पूर्णत्वाची प्राप्ती हा जीवनाचा मुक्काम आहे. आनंदाची, त्यागाची, ज्ञानाची, कर्तृत्वाची अन् प्रतिभेची पूर्णता येण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील पौर्णिमेचा परिपूर्ण चंद्र उगवावा लागतो.

पूर्णत्व व पौर्णिमा यांचा अन्न्यसाधारण संबंध आहे. अश्विनीतील कोजागिरी पौर्णिमा ही जागृतीची पूर्णत्व घेऊन येणारी नितांतसुंदर रात्र आहे.

कोजागिरी पौर्णिमा म्हणजे जागृतीचा, वैभवाचा, आनंदाचा, उत्साहाचा उत्सव. या शुभरात्री स्वतः चंद्रमा आपल्या सोळाही कलांनी फुललेला असतो आणि अवनीच्या सर्वांचिक जवळ असतो. याची प्रेरणा घेऊनच गोकुळात श्रीकृष्ण व गोपिका एकत्र, जवळ येऊन रास गरबा हर्षोल्हासाने खेळत. आजच्या जमान्यात दांडियाच्या प्रोफेशनल कार्यक्रमांत मावभानवतीची खरी गुंतवणूक व प्रेमभावना असते काय?

किती उदात्त कल्पना आहे कोजागिरीची! शरद ऋतुची आल्हाददायक हवा, स्नेहीजनांचे एकत्र येणे, चंद्राच्या अमृत बरसवणाऱ्या चांदण्यात सुमधुर दुग्धाप्राशन व स्नेहीजनांचे हितगुज...

चंद्राची सुंदरता अन् शितलता यांच्या शांतीरूप समन्वयाची अनुभूती घेण्यासाठी कोजागिरीच्या सर्वांगसुंदर पौर्णिमेचा अनुभव घेणे जीवनाचा एक अवीट, अविस्मरणीय प्रसंग असतो. त्यासाठी तुम्हालाही शुभकामना.

"मुसाफिर"–९८२२०२०६९१

नगर अर्बनच्या आणखी तीन शाखा होणार बंद

दैनंदिन खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने निर्णय

नगर – रिझर्व्ह बँकेने नगर अर्बन बँकेचा व्यवसाय परवाना रद्द केल्यानंतर अवसायनात निघालेल्या बँकेच्या आणखी तीन शाखा ८ नोव्हेंबर पासून बंद करण्यात येणार आहेत. दैनंदिन खर्चात बचत करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली. बंद होणाऱ्या शाखांमध्ये बालमटाकळी, वांबोरी व कोल्हार भगवतीपूर या तीन शाखांचा समावेश असून बालमटाकळी शाखेचे कामकाज शेवगाव शाखेतून, वांबोरी शाखेचे कामकाज नगर मुख्य शाखेतून तर कोल्हार भगवतीपूर शाखेचे कामकाज बेलापूर शाखेतून होणार आहे. या तीनही शाखांच्या इमारती स्वमालकीच्या आहेत.

बंद होणाऱ्या शाखांमधील खातेदार लॉकर धारकांनी आपल्या लॉकर मधील मौल्यवान ऐवज / वस्तू काढून घेऊन लॉकरच्या चाव्या बँक प्रशासनाकडे सुपूर्द करायाव असे आवाहन देखील बँक प्रशासनाकडून करण्यात आले आहे. यापूर्वी भाडेतत्त्वावरील कार्यालय असलेल्या बँकेच्या १३ शाखा बंद करण्यात आलेल्या आहेत. बँकेतील सर्व ठेवीदारांचे पैसे सुरक्षित असून डी आय सी जी सी व केंद्रीय निबंधक नवी दिल्ली यांच्या नियमानुसार व आदेशानुसार वितरण करण्याची प्रक्रिया सुरू असून सर्व ठेवीदारांनी केवायसीची पूर्तता करुन आपले क्लेम फॉर्म नजीकच्या शाखेमध्ये लवकरात लवकर भरुन द्यावेत असे आवाहन अवसायक गणेश गायकवाड यांनी केले आहे

स्वतःचे घर भेटण्यासाठी बेघर कुटुंबाचा महापालिकेवर मोर्चा

नगर – बोल्हेगाव गावठाण येथील २ हेक्टर १ आर ही जागा महाराष्ट्र शासनाची असून ती शासनाच्या ताब्यातच आहे. ती जागा मनपाने घ्यावी ती जागा पडिक असून मागासवर्गीय व अनुसूचित जाती जमातीचे १०० ते १५० कुटुंब गांधीनगर बोल्हेगाव गावठाण येथे सुमारे १५ ते २० वर्षापासून भाडेतत्वावर रहिवास करत आहे. त्यामुळे ही जागा गोरगरिबांच्या घरकुल योजनेअंतर्गत रमाई आवास योजनेसाठी उपयोगात घेऊन योजना राबवण्याची मागणी मनपा उपायुक्त विजयकुमार मुंडे यांच्यावर सत्यशोधक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाऊंडेशनच्या वतीने निवेदन देऊन करण्यात आली.

स्वतःचे घर भेटण्यासाठी बेघर कुटुंबाचा महानगरपालिकेवर मोर्चा काढण्यात येवून उपायुक्तांना निवेदन देण्यात आले.

यावेळी फाउंडेशनचे उपाध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, कर्मा वावरे, बाळासाहेब साठे, चंद्रभागा लोखंडे, अतुल काते, आशा शेंडगे, जया मोकळ, सुमन शेवाळे, आशा पिंगळे, अलका पाटील, वैशाली शिरसाट, आशा पनरे, रूपाली वाल्हेकर, सुवर्णा ब्राह्मणे, उषा बुडखुडे, परसराम वाघमारे, रेणुका शिंदे, अनिता साबळे, सरस्वती साठे, जगन्नाथ भोसले, संगीता गुंजाळ, अर्चना ओहोळ, अनिता कुन्हाडे, मंगल शिंदे, सविता आव्हाड, बबई ससाने, अनिता वाघमारे, निवृत्ती पिंगळे, आशा काते, राणी दिवटे, लक्ष्मी भालेराव, विशाल साबे, वनिता बारहाते, प्रशांत लोंढे, सतीश लोखंडे, मंगल आढाणळे, अनिता लोखंडे, अनिता थोरात, पायल लोखंडे, अशोक वाघमारे, वनिता बारहाते आदीसह बेघर कुटुंबीय उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, गांधीनगर बोल्हेगाव गावठाण येथे १५ ते २० वर्षापासून भाडेतत्त्वावर राहत असून हे कुटुंब बेरोजगार आहे. त्यामधील काही कुटुंबातील व्यक्ती हे भंगार गोळा करतात मजुरीचे काम करतात, हमालीचे काम करतात असे वेगवेगळ्या प्रकारे आपली उपजीविका चालवीत आहे. परंतु त्यांना राहण्यासाठी स्वतःचे घर नसून ते भाडयाच्या घरात राहून त्यांना भाडे भरावे लागते. तरी त्यांना पैसे कधी मिळतात तर कधी मिळत नाही अशा वेळी त्यांना भाडे भरणे परवडत नाही तरी बोल्हेगाव गांधीनगर येथे महाराष्ट्र शासनाच्या नावे असलेली पडीक जागा सुमारे ९ एकर रमाई आवास योजना, पंतप्रधान आवास योजना, यशवंत आवास योजना राबवण्यासाठी घरकुल साठी मिळावी त्यामुळे गोरगरीब जनता ही घराचे भाडे न भरता स्वतःच्या घरात जाणार असल्याचे म्हटले आहे.

साडेतीन वर्षापूर्वी पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलीचा लावला शोध

आरोपीसह घेतले ताब्यात, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाची कारवाई

नगर – गेल्या साडे तीन वर्षांपासून बेपत्ता असलेल्या अल्पवयीन मुलीसह तिला फूस लावून पळवून नेणाऱ्या आरोपीला शोधण्यास नगरच्या पोलिस अधीक्षक कार्यालयातील अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षातील (ए.एच. टी.यु.)पथकाला अखेर यश आले आहे. विशेष म्हणजे स्थानिक पोलिस ठाण्यातून ए.एच.टी.यु. कक्षाकडे तपास वर्ग झाल्यावर अवघ्या काही तासांत हा गुन्हा उघडकीस आला आहे.

साडे तीन वर्षांपूर्वी पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलीसह आरोपीला पकडल्यानंतर त्यांच्या समवेत अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे पथक.

संगमनेर तालुक्यातील घारगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतून एका अल्पवयीन मुलीला अज्ञात आरोपीने दि.१५ मार्च २०२१ रोजी फुस लावुन पळवुन नेले होते. सदर बाबत घारगाव पोलिस ठाण्यात भा.दं.वि.कलम ३६३, ३७० प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्ह्याचा तपास न लागल्याने तो नुकताच ए.एच.टी.यु. कक्षाकडे तपासकामी वर्ग करण्यात आला होता.

सदरची कारवाई पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब शिंदे, पो.हे.कॉ. समीर सय्यद, महिला पो.हे.कॉ. अर्चना काळे, अनिता पवार, महिला पो.कॉ. छाया रांधवन, चालक पो.कॉ.एस.एस.काळे यांचे पथकाने केली आहे.

या गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब शिंदे यांना माहिती मिळाली की सदर अपहरीत मुलगी ही रहिमपूर (ता.संगमनेर) येथे असून तिला फूस लावून पळवून नेणारा आरोपी हा त्याच गावातील आकाश उर्फ अक्षय गणपत मोरे हा आहे. ही माहिती मिळताच उपनिरीक्षक शिंदे व पथकाने तेथे जावून आरोपीला तसेच अपहरण झालेल्या मुलीला आणि त्यांच्या १ वर्षाच्या मुलीला ताब्यात घेतले व पुढील कार्यवाहीसाठी घारगाव पोलिसांच्या ताब्यात दिले.

ओला, अप्पर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे, पोलिस उपअधीक्षक गणेश उगले, स.पो.नि. सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब शिंदे, पो.हे.कॉ. अर्चना काळे, अनिता पवार, महिला पो.कॉ. छाया रांधवन, चालक पो.कॉ.एस.एस.काळे यांचे पथकाने केली आहे.

महावितरणच्या सहाय्यक अभियंत्यास ५ हजार रुपयांची लाच घेताना पकडले

नगर – शासकीय विद्युत ठेकेदाराकडून पाच हजारांची लाच घेताना महावितरणचा सहाय्यक अभियंता राकेश पुंडलिक महाजन (वय ४२, रा. सटाणा, जि. नाशिक) याला रंगेहाथ पकडले आहे. नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मंगळवारी (दि.१५) ही कारवाई केली. त्याच्या विरोधात सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासकीय ठेकेदारांना वाळवणे (ता. पारनेर) येथील खासगी रिसॉर्टच्या ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम मिळाले आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करुन देण्याकरिता सुपा (ता. पारनेर) येथील सहायक अभियंता कार्यालयात कार्यरत असलेला सहाय्यक अभियंता महाजन याने ठेकेदाराकडे लाच मागणी केली होती. तशी तक्रार ठेकेदारांनी येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सोमवारी (दि.१४) केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने काल, मंगळवारी (दि.१५) लाच मागणी पडताळणी केली असता महाजन याने तक्रारदाराकडे पंचासमक्ष पाच हजार रुपये लाचेची मागणी करुन ती स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान, तक्रारदाराकडून पाच हजार रुपये स्वीकारताना महाजन याला पथकाने रंगेहाथ पकडून ताब्यात घेतले आहे.

पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा घारगे– बालावलकर, पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सदरची कारवाई केली आहे.

स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीतर्फे भिंगारमध्ये १९ ऑक्टोबरला रक्तदान शिबीर

भिंगार – स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनी ट्रस्ट भिंगार यांच्यावतीने २३ वे रक्तदान शिबीर जनकल्याण रक्तपेढी नगर यांचे सहकार्याने १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत देशमुख सांस्कृतिक भवन, खळेवाडी येथे आयोजित केल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रमोद मुळे यांनी दिली.

स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनी (ट्रस्ट) भिंगार ही सेवाभावी संस्था गेली २८ वर्षे विविध सामाजिक, शैक्षणिक, सेवाविषयक, समाजउपयोगी उपक्रम राबवित आहे. गेली २२ वर्षे सातत्याने रक्तदान शिबीराचे आयोजन करुन रुग्ण सेवेच्या कार्यात सहभागी होत आहे.

संस्थेच्या वतीने या शिबीरातून आजवर २६९३ इतक्या विक्रमी संख्येने रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे. सामाजिक बांधीलकी असणारे रक्तदातेच सहकार्य करीत असल्याने सलग २२ वर्षे शिबीर उच्चांकी संख्येने यशस्वी झाले असल्याची माहिती संस्थेचे शिवप्रसाद काळे, रुपेश भंडारी, राम घुले, सौ. विजया देशमुख, रितेश फिरोदिया, सुरेश वरुडे यांनी दिली.

माजी महापौर अभिषेक कळमकर यांची नगरमध्ये जनसंवाद यात्रेतून मतपेरणी

नगर – राज्यात विधानसभा निवडणुकीची अधिकृत घोषणा होताच आचारसंहितेचा अंमल सुरु झाला आहे. निवडणुक जाहीर झाल्यामुळे राजकीय घडामोडींनाही वेग आली आहे. महायुती व महाविकास आघाडीचे जागा वाटप दोन तीन दिवसांत जाहीर होण्याची शक्यता आहे. नगर शहरात महाविकास आघाडीचे इच्छुक उमेदवार माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी महिनाभरापासून नगर जन संवाद यात्रा काढून सर्व प्रमाग पिंजून काढले आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाकडून कळमकर यांचे नाव मतदारांमध्ये आघाडीवर आहे. त्यामुळे त्यांनी गणेशोत्सव, नवरात्र उत्सवात व्यापक जनसंपर्क अभियान राबविले आहे. नगर शहराच्या शाश्वत विकासाची ग्वाही देत त्यांनी मतदारांना साकडे घातले आहे.

नगरमध्ये जनसंवाद यात्रा काढून नागरिकांशी थेट संवाद साधताना माजी महापौर अभिषेक कळमकर.

अभिषेक कळमकर यांनी मागील वर्षभरापासून विधानसभा निवडणुकीची तयारी चालवली आहे. शहरातील कायदा सुव्यवस्था, औद्योगिक विकास, सुरक्षित वातावरण आणि सुसंस्कृत राजकारण असे मुद्दे घेवून ते मतदारांशी संवाद साधत आहेत. जन संवाद यात्रेव्दारे त्यांनी सर्व समाजघटक, युवा वर्ग, महिला वर्ग, ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला आहे. नगरच्या खऱ्या विकासासाठी परिवर्तन घडविण्याचे आवाहन त्यांनी वेळोवेळी केले आहे.

'तुतारी'वर लढण्याची जय्यत तयारी

शरद पवार गटाकडे त्यांनी उमेदवारीसाठी अर्ज केलेला असुन पुण्यात पक्षाच्या निवड समितीसमोर मुलाखतही दिलेली आहे. महापौरपदी असताना शहरात केलेली विकासकामे तसेच येणाऱ्या काळात नियोजनबध्द विकासाचे व्हिजन त्यांनी लोकांसमोर उभेवले आहे. ज्येष्ठ नेते माजी आ.दादाभाऊ कळमकर यांना माननारा मोठा समर्थक वर्ग नगर शहरात आहे. याशिवाय महाविकास आघाडीतील स्थानिक पदाधिकारी, नेत्यांनीही उमेदवार कोणीही असला तरी एकदिलाने काम करण्याचा निर्धार केला आहे. शिवसेना ठाकरे गट, कॉंग्रेसच्या नेत्यांशी, पदाधिकाऱ्यांशीही अभिषेक कळमकर यांचे चांगले संबंध आहेत. त्यामुळे तुतारीच्या चिन्हावर निवडणूक लढवून परिवर्तन घडविण्याचा निर्धार करील त्यांनी शहरातील प्रत्येक प्रमाग पिंजून काढला आहे.

भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीतील दोघे जण हद्दपार

नगर – विधानसभा निवडणूक शांततेत पार पडावी, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर कारवाई सुरु केली आहे. भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीतील दोघा रेकॉर्डवरील गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. निलेश उर्फ काळ्या मारुती जायभाय (रा. त्रिमुर्ती चौक, सारस नगर), आन्या उर्फ आनंद राजेंद्र नायकु (रा. नेहरु चौक, माळ गल्ही, भिंगार) अशी त्या दोघांची नावे आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीतील रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी दिले होते. त्यानुसार निलेश जायभाय व आनंद नायकु यांच्यावर हद्दपारीची कारवाई करण्याचा प्रस्ताव स.पो.नि. नि. जगदीश मुलगीर यांनी प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्याकडे दिला होता. त्यास त्यांनी मंजुरी देत दोघांच्या हद्दपारीचे आदेश काढले. त्यानंतर सदर हद्दपार इसमांना ताब्यात घेऊन अहिल्यानगर जिल्ह्याचे सरहद्दी बाहेर सोडण्यात आले आहे. सदरची कार्यवाही सहा. पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांचे मार्गदर्शना खाली स.पो.नि. कैलास सोनार, पो.हे.कॉ. संदिप घोडके, दिपक रिंदे, रवी टकले, गोविंद गोल्हार, कासार, पो.कॉ. प्रमोद लहारे, सनिर शेख यांनी केली आहे.

नगर शहरातील २ कत्तलखान्यांवर पोलिसांची छापेमारी

एका ठिकाणी ७ जनावरांची सुटका तर दुसऱ्या ठिकाणी गोमांस जप्त

नगर – नगर शहरातील २ कत्तल कत्तलखान्यांवर कोतवाली पोलिसांनी सलग २ दिवस छापेमारी करत एका ठिकाणाहून कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या ७ जनावरांची सुटका केली तर दुसऱ्या ठिकाणी ८५ किलो गोमांस जप्त केले आहे.

पहिली कारवाई सोमवारी (दि.१४) दुपारी झेंडीगेट परिसरातील कारी मस्जिद शेजारी एका पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या कत्तलखान्यावर करण्यात आली. सदर ठिकाणाहून ८५ किलो गोमांस, वजन काटा, चाकू असा १७ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पोलीस अंमलदार सुजय हिवाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोहसिन मुस्ताक कुरेशी (वय ३६, रा. सदर बाजार, भिंगार) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई गंगळवारी (दि.१५) सायंकाळी शहरातील हमालवाडा येथील कुरेशी मस्जिद शेजारी करण्यात आली. त्या ठिकाणी छापा टाकला असता तेथे ७ लहान मोठी जनावरे कत्तल करण्यासाठी डांबून ठेवल्याचे आढळून आले. या जनावरांची सुटका करत याप्रकरणी तौसिफ कुरेशी (रा. कुरेशी मस्जिद शेजारी, हमालवाडा, अहिल्यानगर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी बाळासाहेब धनवे निलंबित

नगर – जामखेडचे तत्कालिन गटशिक्षणाधिकारी व सध्या माध्यमिक विभागातील उपशिक्षणाधिकारी बाळासाहेब धनवे यांना निलंबित करण्याचा आदेश शालेय शिक्षण विभागाने मंगळवारी (दि.१५) काढला.

जामखेड येथे गटशिक्षणाधिकारी असताना धनवे यांच्याविरोधात एका शिक्षकेने तक्रार केली होती. धनवे जाणूनबुजून त्रास देतात, असे तक्रारीत म्हटले होते. त्यावरून महिला तक्रार निवारण समितीने ऑगस्ट २०२४ मध्ये त्यांची चौकशी केली. चौकशीत तथ्य असल्याचा अहवाल समितीने जामखेड गटविकास अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठवला होता.

जिल्हा परिषदेने हा अहवाल शासनाकडे पाठवल्यानंतर मंगळवारी (दि.१५) शालेय शिक्षण विभागाचे सहसचिव टि. वा. करपते यांनी धनवे यांच्या निलंबनाचे आदेश काढले. निलंबन काळात धनवे यांचे मुख्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक) असेल, तसेच त्यांना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही, असे आदेशात म्हटले आहे.

यमुनाबाई बोरुडे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – येथील बालिकाश्रम रोडवरील बोरुडे मळ्यात देवी मंदिराजवळ राहणाऱ्या यमुनाबाई हरिभाऊ बोरुडे (वय ७३) यांचे १६ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वा. हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर दुपारी १.३० नंतर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कॉन्ट्रॅक्टर प्रदिप बोरुडे व ज्ञानेश्वर बोरुडे व माजी नगरसेविका सुनिता फुलसौंदर व शारदा कळमकर यांच्या मातोश्री तर माजी महापौर भगवान फुलसौंदर यांच्या त्या सासू होत.

मोडी लिपी मध्ये प्रचंड रोजगाराची संधी : वि.पा.पाटील

नगर – मोडी लिपीला मोठा इतिहास आहे. त्यामुळे मोडी लिपीमध्ये असलेल्या कागदपत्रांमध्ये अमूल्य ठेवा आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षात मोडी लिपीच्या संवर्धनासह कागदपत्रांतील माहिती जाणून घेण्याकडे तरुणाई मोडी लिपी शिकण्याकडे वळू लागली आहे. मोडीमध्ये बरेचसे शब्द फारसी भाषेतील आहेत. बाहमनी काळ, शिवकाळ, पेशवेकाळ, आंग्लकाळ या वेळेस ते दस्त ऐवज मोडी लिपी मध्ये असून मोडी लिपी मध्ये प्रचंड रोजगारची संधी आहे, असे मत संशोधक साहाय्यक वि. पा. पाटील यांनी व्यक्त केले.

पुरभिलेख संचनालय, महाराष्ट्र शासन व न्यु आर्ट्स कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज आयोजित मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन कार्यक्रमात वि.पा.पाटील बोलत होते. यावेळी संशोधक साहाय्यक ल.ब.भिसे, प्राचार्य डॉ.बी.बी.सागडे, उपप्राचार्य डॉ. ए.ई.आठरे, उपप्राचार्य डॉ. एस.बी.कळमकर, डॉ.किसन अंबाडे, प्रा.डॉ.मीना साळे आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. बी. बी. सागडे यांनी विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमध्ये सहभागी होऊन नवीन ज्ञान प्राप्त करण्याचे आवाहन करून मोडी लिपीचा नियमित सराव करावा व जास्तीत जास्त इतिहास ची माहिती जाणून घ्यावी असे सांगितले.

प्रास्ताविक डॉ. मीना साळे यांनी केले. सूत्रसंचालन वैष्णवी चत्तर यांनी केले प्रा.सागर सप्रे यांनी आभार मानले.

न्यू आर्ट्स कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजमध्ये आयोजित प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन

मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना संशोधक साहाय्यक वि.पा.पाटील. (छाया – सागर इंगळे)

गृहिणी

आरोग्य

दुधी भोपळा हृदयरोग्यांसाठी वरदान

लोह, कॅल्शिअम, फॉस्फरस ब जीवनसत्त्व प्रथिने, खनिजे, आर्द्रता, तंतूमय व पिष्टमय पदार्थ हे सर्व पोषक घटक दुधी भोपळ्यामध्ये असतात. आयुर्वेदानुसार दुधी भोपळा हा पित्तशामक व कफनाशक, हृदय, मूत्रल, सप्तधातूंचे पोषण करणारा व बलकारक आहे.

दुधी भोपळ्यामध्ये कमी उष्णांक असल्याकारणाने तो हृदयरोग्यांसाठी एक वरदानच ठरला आहे.

पाककला

रताळ्याचा राजस पाक

साहित्य : दीड किलो रताळी, दोन नारळांचा चव, सहा-सात वाटया साखर, पाव किलो खवा, ट्रुटी-फ्रुटी, आवडीनुसार सुकामेवा, रताळी परतण्याइतपत साजूक तूप, दोन वाट्या दूध.

कृती : रताळी स्वच्छ धुऊन, सालं काढून टाकावीत, किसणीवर किसून घ्यावीत. साजूक तुपावर कीस चांगला परतावा. नंतर नारळाचा चव घालून परतावा. नंतर खवा घालून परतावा. साखर+दूध घालून पुन्हा परतावा आणि हलव्याइतपत घट्ट झाल्यावर खाली उतरवावा. खाली उतरवून त्यात आवडीनुसार काजू, बदाम, टुटीफ्रुटी घालून सजवा. जास्त गोड हवं असल्यास साखर जास्त घालावी. मात्र रताळ्याजाही अंगाची गोडी असते हे लक्षात घेऊन साखरेचं प्रमाण ठरवावं.

सल्ला

श्रीखंडाच्या वड्या बनवताना

खोबऱ्याच्या, श्रीखंडाच्या अगर दुसऱ्या कसल्याही वड्या ताटात अगर थाळीत थापल्यास, वड्या तयार झाल्यावर त्या काढावयाच्या वेळी ताट अगर थाळी गरम करावी अगर वाफेवर ठेवावी, म्हणजे वड्या खालून चांगल्या सुटतात. त्याचप्रमाणे श्रीखंडात सुकेमेवे देखील घालावेत.

सौंदर्य

कच्च्या दुधात चिमूटभर मीठ घालून त्वचेवर चोळावे. त्वचा स्वच्छ होते. स्क्रब होते.

वास्तू

प्रफुल्लित, आनंददायक वातावरणासाठी रात्री झोपताना सौम्य सुगंधाचा सेंट, अगरबत्ती, सुगंधित फुले यांचा वापर करावा.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १७ ऑक्टोबर २०२४

कार्तिकस्नानारंभ, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, रेवती १६।२०, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३३ मि.

राशिभविष्य

मेष – आपली स्थिति, वास्तविकता वाढेल. पारिवारिकदृष्ट्या वेळ सामान्य. कामाचा ताण जाणवेल.

वृषभ – मनोरंजनात वेळ जाईल. कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील. नवीन करार होतील. **मिथुन** – खासगी कामाकडे जास्त लक्ष द्याल. पैसा मिळेल. जबाबदारीची कामे पडतील. जुने मित्र भेटतील.

कर्क – शत्रूपक्ष हावी राहील. एखाद्या मन रमणार नाही. व्यावसायिक अडचणी सतावतील. उत्साह, आत्मविश्वास वाढेल. अडकलेला पैसा मिळेल.

सिंह – मार्ग प्रशस्त होईल. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील.

कन्या – गैरसमज दूर होतील. दिवस आनंदात जाईल. समाजात मानसन्मानाचे योग येतील.

तूळ – आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील.

वृश्चिक – आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. नवीन ओळखी संभवतात. मानसन्मानात वाढ होईल.

धनु – संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. आपल्या क्रोधावर संयम ठेवल्याने लवकर यश मिळेल.

मकर – नवीन कार्य सुरू करणे धोक्याचे नुकसानीचे ठरेल. यश मिळणार नाही. वाहन चोरीस जाण्याची शक्यता आहे.

कुंभ – कामांची गती मंदावेल. मात्र पूर्वीपासून आपल्या मनातील असलेले संकल्प पूर्ण होतील.

मीन – अडकलेला पैसा मिळेल. भूमि, घर विकत घेण्याचे योग. आरोग्यात सुधारणा. पितृचिंता जाणवेल.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

हसा आणि शतायुषी व्हा!

बाळोबांचा मुलगा अतिशय ढ होता. एस. एस. सी. ला बरेच वेळा गोते खाल्ल्यावर शेवटी तो कसाबसा पास झाला. आता तो बी.ए.ला आठव्यांदाम बसत होता.

बाळोबाला त्याच्या मित्रांनी विचारले, 'तुझा मुलगा बी.ए. झाल्यावर कोण होणार?'

'म्हातारा' बाळोबा म्हणाले.

...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* ईराण या देशाची राजधानी कोणती? – तेहरान
* खालीलपैकी कोणता खेळाडू क्रिकेट खेळाशी संबंधीत आहे? – रजनीश गुरबाणी
* लंडन हे शहर कोणत्या नदीवर वसले आहे? – थेम्स्
* भारत व चिन यांच्या दरम्यानच्या सिमारेषेला कोणती लाईन म्हणातात? – मॅकमोहन लाईन

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

शब्दगंध क्र. ७०३२ सौ.शैलजा कुलकर्णी

शब्दगंध क्र. ७०३१ चे उत्तर

आडवे शब्द :– १) शे; शत ४) तपस्व्यांची राहण्याची जागा ७) सबब; प्रयोजन; निमित्त ८) वाईट सवय; खोड ९) जिल्ह्याचे ठिकाण असलेले विदर्भातील एक शहर ११) व्याकूळ १३) वजनदार; मंद; ढ १४) विष; गरळ १७) लहान मुलाचा मुका १८) काज; कार्य १९) चेहरा; मुद्रा २०) एक सुगंधी फूल व त्याचे झाड २१) एक हजार किलो किंवा दहा क्विंटल वजनाचे माप २२) गायनात निरनिराळ्या सुरांनी केलेला रागाचा विस्तार २३) वृत्त; बातमी; समाचार

उभे शब्द :– १) संशय; संदेह; शक २) विश्वास; खात्री ३) लढाई; युद्ध; वाळवंट ४) फार बारीक व मऊ ५) अंगाला शेंदूर फासून मरीआईच्या नावाने भिक्षा मागणारा ६) नवी पालवी; तारुण्याचा भर ९) सहकार्य न करण्याचे धोरण १०) एक झाड; वटवृक्ष ११) शरीरात होणारा पूर्ण बदल १२) विद्युत; चपला; दामिनी १५) मुस्लिम वर्षाचा नववा महिना १६) सरोवर; जलाशय; समुद्र १९) मूल पाडणारे भूत

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : सूर्याच्या किरणांनी ज्याप्रमाणे बर्फाच्या राशी वितळतात; त्याप्रमाणे अहंकाराच्या राशी प्रेमाच्या ओलाव्याने वितळतात.

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

बुडून मेलेला माणूस व मेल्यानंतर पाण्यात फेकलेला माणूस यांच्यात काही फरक आढळून येतो का?

माणूस बुडून मेला काय किंवा मेल्यावर त्याला पाण्यात टाकले काय, दोन्ही सारखेच; असे कोणालाही वाटेल. काही गुन्हेगारांनाही तसेच वाटते! त्यामुळे एखाद्या व्यक्तीचा गळा दाबून खून करून मग ते त्या व्यक्तीला नदीत ढकलून देतात. पोलिस तपासात ते, त्या व्यक्तीने पाण्यात उडी घेऊन आत्महत्या केली असा बचाव करतात; पण हुशार तपासणी अधिकारी डॉक्टरांच्या मदतीने त्यांचा खोटेपणा उघडकीस आणतात. ते कसे ते आता पाहू.

जिवंत माणसाला पाण्यात टाकले, तर त्याचे श्वसनाचे प्रयत्न पाण्यात बुडाला तरीही अखेरच्या क्षणापर्यंत चालू राहतात. त्यामुळे या प्रयत्नात त्याच्या फुफ्फुसात पाणी व पाण्यातील काही घटकही जातात. हृदयाचे कार्य चालू असल्याने 'डायॲटम'सारख्या अलगी फुफ्फुसातून मेंदू, अस्थिमज्जा अशा शरीराच्या इतर भागातही पोचतात. मृत व्यक्तीला पाण्यात टाकल्यास ती श्वसनाचा प्रयत्न करणे शक्य नसते. साहजिकच तिच्या फुफ्फुसात पाणी, डायॲटम जात नाहीत व तेथून रक्तामिसरण चालू नसल्याने इतर अवयवांतही जात नाहीत. त्यामुळे फुफ्फुसाच्या अवस्थेवर व इतर काही बाबींवरून व्यक्ती पाण्यात बुडून मेली आहे वा नाही हे ओळखता येते. पाण्यात बुडून मेलेल्या व्यक्तिच्या उत्तरीय तपासणीत असे दिसून येते की, प्रेताच्या नाकातोंडातून किताही पुसला तरी साखरा व भरपूर असा फेस येत राहतो. दुसरे म्हणजे शेवटच्या धडपडीत बुडणारी व्यक्ती पाण्यातच सापडू शकेल अशी वस्तू हातात घट्ट धरते व ती वस्तू तपासणीत सापडते.

श्वासमार्गातही विशिष्ट असा फेस असतो. फुफ्फुसांचे आकारमान वाढते व ती सुजलेली दिसतात. तसेच मेंदू व अस्थिमज्जा या भागात डायॲटम सापडतात. महत्त्वाचे म्हणजे खून करून पाण्यात फेकलेल्या व्यक्तीमध्ये उपरोक्त लक्षणाचा अभाव असून ज्या कारणाने खून झाला असेल (जसे गोळी घालून, गळा दाबून, फासावर लटकवून, विष देऊन) या कारणाचे पुरावेही सापडतात. एकूण काय, प्रेतही गुन्हेगारविरुद्ध साक्ष देते!

राष्ट्रसेवा

स्वामी रामतीर्थ अमेरिकेला चालले होते तेव्हाची गोष्ट. ते ज्या जहाजात बसले होते त्यातून सुमारे दीडशे जपानी विद्यार्थी अमेरिकेला चालले होते. स्वामीजींचा त्यांच्याशी परिचय झाला. आणि ते विद्यार्थी स्वामीजींच्या ज्ञानाने फारच प्रभवित झाले त्या विद्यार्थ्यांपैकी अनेकजण श्रीमंत कुटुंबातील होते. स्वामीजींनी त्यांना बोलता बोलता विचारले, ''तुम्ही सर्व अमेरिकेला शिक्षणासाठी जात आहात का'' सर्वांनी स्वामीजींना विशेष अध्ययनासाठी जात असल्याचे सांगितले तेव्हा स्वामीजींनी या सर्वांना सहज प्रश्न केला, ''बरं, हे सांगा, बरेच दिवस तुम्ही अमेरिकेत राहणार आहात, तर त्यासाठी पैशाची व्यवस्था आपल्याकडे काय आहे'' स्वामीजींच्या त्या प्रश्नाचे उत्तर त्या विद्यार्थ्यांनी दिले,''

स्वामीजी आम्ही तर या जहाजाचे भाडेही सोबत आणलेले नाही. जहाजात काही काम करून त्याचे भाडे देऊ आणि अमेरिकेतही आपल्या शिक्षणाचा खर्च एखादी नोकरी करून भागवू. आपल्या राष्ट्राचे धन व्यर्थ विदेशात का खर्च करावे, स्वामी रामतीर्थांनी पाहीले की सर्व विद्यार्थी जहाजात सफाई आणि छोटे मोठे काम करून जहाजाचे भाडे जमा करीत होते त्यांचे देशप्रेम पाहून स्वामीजी फारच प्रसन्न झाले आणि मनात विचार करू लागले की, विदेशात शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांनीही असा विचार केल्यास भारताला संपन्न राष्ट्र बनायला वेळ लागणार नाही

तात्पर्य– देशातील साधनांचा, धनाचा सद्उपयोग अशी राष्ट्रसेवा आहे की ज्यामुळे राष्ट्र जलदगतीने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू शकते.



जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

वस्त्र जो पहनने योग्य नहीं रहता उसे उतार कर एक नया मन पसन्द फैशन का वस्त्र पहन लिया जाता है। कर्ता की रचना में प्रकृति का यही नियम है। कहा जाता है कि दयालु पिता ने हुक्म दे रखा है कि उसके बच्चे जो मांगेंगे वह देगा।

पिता कृपाल आगिया एह दीनी,
बारिकु मुखि मांगै सो देना ।।

ने अत्यन्त उदारता से धरती पर जीव के प्यार, रोशनी और जीवन जैसी अधिकतर महत्वपूर्ण आवश्यकतायें और इससे सम्बन्धित आवश्यक तत्व जैसे पृथ्वी, पानी, हवा, सूर्य और आकाश समेत उपजीविका के साधन प्रदान किये हैं। यह दातें प्रभु की तरफ से सभी को जीव की आवश्यकता अनुसार मुफ्त मिलती है। उसकी बख्शिशें अनगिनत और असंख्य हैं और युगों-युगों से मनुष्य इन्हें प्रयोग करता आया है। इन असीम सुविधाओं पर सन्तुष्ट न होकर जीव और अधिक सोना, चाँदी, जीवन की और सुविधाएँ, सुख आराम के साधन तथा सब

जीवन की रोशनी

कुछ ही और अधिक चाहता है और इनकी प्राप्ति के लिये निरन्तर भाग-दौड़ और संघर्ष करता रहता है। इन सुविधाओं के लिये परमात्मा का आभारी होने की बजाय हम अपने आसपास के अधिक आनन्दित लोगों और अपने ही कर्मों द्वारा बनाए हुए अपने भाग्य को कोसते रहते हैं।

दस बसतू लै पाछै पावै ।।
एक बस कारनि विछोरा गवावै ।।
(गऊड़ी सुखमनी मः ५)

अपनी सभी सम्पत्तियाँ प्राप्त करके भी मनुष्य एक गुणहीन वस्तु के लिये रोता रहता है। मनुष्य जन्म दुर्लभ है और बड़े ऊँचे भाग्य से मिलता है। वह असीम समय में फैली हुई विकास प्रक्रिया में से निकल कर प्राप्त होता है। मनुष्य जन्म का तात्पर्य हमारे अपने ही अन्दर छिपी हुई रूहानी सम्पत्ति जिस के बारे में हम अनभिज्ञ हैं, को एकत्र करना है। परन्तु हम में से बहुत सारे इस सच्चे आनन्द को प्राप्त करने के विपरीत क्षणभंगुर इन्द्रियों के भोगों रसों के पीछे पड़े हुए हैं। यह सीमित काल और तेजी से आगे जाती सुख सुविधाओं (ऐश आराम) के सामान जिन को सब अच्छे बुरे ढंगों से प्राप्त करने के लिये हम दिन रात एक कर देते हैं और जो हमें पता नहीं मिलते भी हैं कि नहीं, अधिकतर हमें बड़े महंगे पड़ते हैं।

बहुत बार हम इनकी प्राप्ति के लिये अपना सारा जीवन भी लगा देते हैं और इन वस्तुओं, इनके लिये किये गये पाप और इस प्रयत्न से सहे गये दुखों और कष्टों पर पछताते हुए इस संसार रूपी मंच से चले जाते हैं।

प्रकृति अपनी कारगुजारी और तात्पर्य में व्यर्थ खर्चीली नहीं। मनुष्य जो सोचता है वह बन जाता है। शरीर के समाप्त होने से हमारी इच्छायें, लालसाएँ, विचार और भावनायें मर नहीं जाती इनका एक भीतरी लिबास बनता है जो स्थूल तन के नीचे होता है। स्थूल शरीर के समाप्त हो जाने से आत्मा इस भीतरी सूक्ष्म लिबास में लिपटी हुई और अपन साथ इससे भी नीचे के अनमोल खजाने रूपी कारण शरीर में किये कर्मों

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

८.२ छात्रों के साथ निम्नलिखित प्रश्नों पर चर्चा करें– मेरी अपने प्रति क्या जिम्मेदारियाँ हैं?

एक छात्र के रूप में मेरी क्या जिम्मेदारियाँ हैं? मैं इन जिम्मेदारियों को

पूरा करके कैसा अनुभव करता हूँ। बड़े बच्चों के साथ चर्चा का विषय यह भी हो सकता है। (जब मैं अपनी जिम्मेदारी पूरी नहीं करता तो कैसा अनुभव करता हूँ या उसके क्या परिणाम होते हैं?) मेरे माता/पिता के लिए मेरी क्या जिम्मेदारी है? जब लोग अपनी जिम्मेदारी पूरी नहीं करते तो मैं कैसा अनुभव करता हूँ? एक व्यक्ति के रूप में सम ाज या दूसरे व्यक्ति के प्रति मेरा क्या उत्तरदायित्व है ? मैं हर किसी को किसके प्रति जिम्मेदार बनाना चाहता हूँ?

छात्रों के छोटे समूह बनाए जा सकते हैं। वे परिचर्चा के बाद विशाल समूह को अपनी रिपोर्ट पेश करें। बड़े बच्चों को परिचर्चा के लिए अधिक समय दिया जा सकता है। इसके लिए कुछ दिन तक प्रतिदिन १५-२० मिनट का समय पर्याप्त होगा।

अपने आप से प्रेम करना

९. सादगी ९.१ सादगी बनाम तड़क–भड़क को स्पष्ट करने के लिए कला, ऐतिहासिक तसवीरों या पत्रिकाओं आदि से उदाहरण लें। एक कोलाज तैयार करें।

९.२ अपने देश के ग्रामीण लोगों की सादगी को देखें। उदाहरण के लिए, नेटिव अमेरिकन भारतीय कबीले, भारत के आदिवासी या ऑस्ट्रेलिया के आदिवासी समूह आदि। वे सादगी से रहने के साथ–साथ प्राकृतिक संसाधनों का भी फिक्षायत से प्रयोग करते हैं।

९.३ किसी बाग, पार्क या समुद्र के किनारे जाएँ। वहाँ सादी वस्तुएँ देखें–पत्ते पर पड़ती रोशनी, पेड़, छोटा फूल, पक्षी या प्रकृति का कोई रूप। उन्हें एक निरीक्षक की तरह अनासक्त भाव से देखें। आपके मन में कोई इच्छा नहीं होनी चाहिए। ९.४ सादगी का चित्रण करें ।

९.५ आप कक्षा में किन उपायों से संरक्षण कर सकते हैं?

१०. सहनशीलता या धैर्य – १०.१ बच्चों से पूछें कि वे कक्षा या समाज में धैर्य के अभाव को कैसा अनुभव करते हैं। क्या कुछ लोग दूसरों की तुलना में धैर्यवान् होते हैं? अगर कोई प्रसिद्ध हो तो लोग उसे अधिक सहन करते हैं? हम अपने आपसे ऐसी क्या बातें कह सकते हैं, ताकि हम दूसरों के प्रति और अधिक सहनशील रवैया अपना सकें?

बच्चों से साहित्य, सामाजिक अध्ययन या इतिहास की कक्षा में पूछें कि उन्हें कौन सा पात्र अगन दिखता है। इस समझ को विकसित करने के लिए उन्हें एक लघुकथा लिखने को कहें, मानो वे स्वयं वही व्यक्ति हों और अपने कर्मों के पीछे छिपे विश्वासों व तर्कों को देने की कोशिश कर रहे हों । १०.२१०.३ बच्चों के ऐसे जोड़े बनाएँ, जो प्रायः एक साथ न रहते हों। वे एक– दूसरे का साक्षात्कार लें।

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

शरीरशुद्धीनंतर देण्यात येणारा आहार हा पचण्यास हलका, धातुवर्धक, बलवर्धक शरीराला मजबुती देणारा असा असावा. आहारामध्ये काळे मनुके, भाजलेले शेंगदाणे व गूळ, गायीचे सात्त्विक तूप, खजूर, लोणी, दूध, बदाम, अंजीर, ओले खोबरे, नाचणीचे पौष्टिक लाडू यांचा समावेश असावा. रोज रात्री झोपताना दोन खारीक, दोन बदाम, चार पाच काळे मनुके भिजत घालावे व सकाळी उठल्यावर प्रथमतः त्यातील बदाम, काळे मनुके व खारीक खाऊन दूध पिऊन घ्यावे. अतिकष्टाची, श्रमाची कामे टाळावीत. प्रवास, रात्रीचे जागरण, अति बडबड करू नये. मन प्रसन्न व आनंदी ठेवावे. अंघोळीला गरम पाणी वापरू नये, थंड किंवा कोमट पाण्याने अंघोळ केल्यावर चहाऐवजी शतावरी कल्प टाकून दध प्यावे. रोज सकाळी व संध्याकाळी १ चमचा दुवांकुर च्यवनप्राश खावा तसेच दिवसभरात पिण्यासाठी सुवर्णसिद्ध जल वापरावे.

सुवर्णसिद्ध जल :

रोज रात्री हंडाभर पाणी उकळण्यास ठेवावे.

गर्भाधान विधी

त्यामध्ये सोन्याचे बिस्किट किंवा वेढणे टाकावे. पंधरा मिनिटे चांगले उकळल्यानंतर ते पाणी थंड करावे. दुसऱ्या दिवशी ते पाणी गाळून प्यावे. या पाण्यामुळे आजारांविरुद्ध लढण्याची प्रतिकारशक्ती तयार होते. तसेच पुरुषांनी कवचबीज, शिलाजीत, गोखरू, अश्वगंधा, सफेद मुसळी, गुळवेल, शतावरी या औषधी द्रव्यांनी युक्त दुर्वांकुर शिलाजित कॅप्सुल सकाळी व रात्री एक या प्रमाणे सुरू करायचात. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या उक्तीप्रमाणे वरील सर्व उपचार, आहार–विहाराने आरोग्य संपन्न व तेजस्वी सुसंस्कारीत बाळ निश्चितच जन्माला येते.

आयुर्वेदामध्ये उत्तम, सुसंपन्न, निरोगी व यशस्वी जीवनासाठी षोडश संस्कार (सोळा संस्कार) ची माहिती सांगितलेली आहे. त्यातील गर्भाधान विधी हा पहिला संस्कार सांगितला आहे. गर्भावस्थेपूर्वी ३ महिने पंचकर्म, सात्त्विक आहार–विहार, मंत्रोपचार, सुयोग्य वाचन ही काळजी घेतल्यानंतर उत्तम संस्कारित बाळ होण्यासाठी गर्भाधान विधी करतात.

मासिक पाळीच्या दहा दिवसांपासून ते अठराव्या दिवसापर्यंत बीजनिर्मिती होऊन बीज फुटत असते. या काळातच पती–पत्नीचा समागम होऊन गर्भधारणा होत असते, त्यामुळे हा काळ गर्भाधान विधीसाठी योग्य समजला जातो. सर्वगुणसंपन्न निरोगी शरीर, सात्त्विक मन व संस्कारयुक्त आत्मा या तिघांचा संयोग होऊन, उत्तम संततीची इच्छा मनात धरून भावी मातापित्याने एकत्र येण्याच्या क्रियेला 'गर्भाधान' असे म्हणतात. पाळीच्या नवव्या दिवसापर्यंत समागम होऊ न देता शुक्रधातूचे (वीर्याचे) रक्षण करावे व पाळीच्या १० व्या दिवसापासून ते १८ व्या दिवसापर्यंत रोज रात्री समागम करावा.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मल–महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

मुलांमधील जन्मजात कलागुण ओळखून प्रोत्साहन द्यावे

छायाताई फिरोदिया यांचे प्रतिपादन; कलर्स ऑफ प्राईड या चित्रकला स्पर्धेतील प्रथम विजेत्यांना सायकलचे बक्षीस

नगर – मुलांमध्ये जन्मजात काही कलागुण असतात. ते ओळखून त्या दिशेने त्यांना प्रोत्साहन दिल्यास त्यांची झपाट्याने प्रगती होते. जगात कला क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांना मोठी संधी असून, कला क्षेत्रात लायन्स प्राईडने विद्यार्थ्यांना एक चांगले व्यासपिठ निर्माण करुन दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या चित्रकला स्पर्धेचे छायाताई फिरोदिया यांनी कौतुक केले.

कलर्स ऑफ प्राईड या चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण करताना श्रीमती छायाताई फिरोदिया. समवेत विजेते स्पर्धक, तसेच अरविंद पारगावकर, स्पर्धेचे आयोजक विविधि क्लबचे पदाधिकारी.

लायन्स क्लब ऑफ अहमदनगर प्राईड, लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लबच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या कलर्स ऑफ प्राईड या चित्रकला स्पर्धेतील प्रथम विजेत्यांना सायकलचे तर इतर विजेत्यांना आकर्षक बक्षीस प्रदान करण्यात आले. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शहरात झालेल्या बक्षीस वितरण कार्यक्रमाप्रसंगी अरविंद पारगावकर, लायन्स प्राईडचे अध्यक्ष अनिकेत आवारे, सचिव अक्षत झालानी, खजिनदार अक्षय तोडमल, लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षा डॉ. अनघा पारगावकर, सचिव डॉ. सिमरन वधवा, लिओ क्लबच्या अध्यक्षा रिधिमा गुंदेचा, हरजितसिंह वधवा, सनी वाधवा, अभिजित भलगट, हर्षवर्धन बोरुडे, रोहन खंडेलवाल, प्रभा अशोक भलगट, समिक्षा खंडेलवाल, अंकिता झालानी, डॉ. अस्मिता आवारे आदींसह लायन्सचे सदस्य उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या या चित्रकला स्पर्धेत शहर व उपनगरातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. विद्यार्थ्यांच्या कला–गुणांना वाव देण्यासाठी दरवर्षी कलर्स ऑफ प्राईड या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेचे हे सहावे वर्ष होते. ही स्पर्धा तीन गटात घेण्यात आली. पहिला गट एलकेजी ते पहिली दुसर गट दुसरी ते पाचवी तिसरा गट सहावी ते दहावी, त्यांना अनुक्रमे रेखाटलेल्या चित्रात रंग भरणे, नैसर्गिक देखावा किंवा सण–उत्सव, जागतिक शांतता किंवा सक्षम भारत हे विषय स्पर्धेच्या ठिकाणी देण्यात आले होते. विशेष गटात झालेल्या स्पर्धेत स्नेहालय, बालभवन, मुकबधीर व दिव्यांग विद्यार्थ्यांचा समावेश होता.

या स्पर्धेत एलकेजी ते इयत्ता पहिली (लहान गट) प्रथम– काम्या वर्मा (आर्मी पब्लिक स्कूल), द्वितीय– संस्कृती झोडगे (अशोकभाऊ फिरोदिया), तृतीय– स्वर्ण सुनील निंबाळकर (एसएनबीपी), द्वितीय– सोम्या सचिन जाधव (कर्नल परब), तृतीय– अपूर्वा नांदूरकर (सेंट थिवलानंद), उत्तेनार्थ– आरुष हेमंत विटणकर (आयकॉन पब्लिक स्कूल), कीर्ती मनोज पवार (अशोकभाऊ फिरोदिया).

विशेष श्रेणीत घेण्यात आलेली स्पर्धा लहान गट प्रथम– सार्थक नवनाथ हरारे (मूकबधिर विद्यालय), द्वितीय– प्रणवी पिसाळ (स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूल), मोठा गट प्रथम– सोहम औरडे (स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूल), द्वितीय– ईश्वरी दीपक बिडकर (किशोर बालभवन), वरिष्ठ गट प्रथम– अशोक दरंदले (मूकबधिर विद्यालय), द्वितीय– श्रृती विलास चकाले (बालभवन डॉ. अ. कलाम). यांनी बक्षिसे मिळवली. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते सर्व विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली.

प्रवीण साळुंके (दक्ष इचरजबाई), उत्तेजनार्थ दक्ष अभय दायमा (एसआरईएफ), दिव्यांग (माउंट लिटेरा झी स्कूल).

इयत्ता दुसरी ते पाचवी (मोठा गट) प्रथम– ओजस वैकर (ऑक्सिलियम कॉन्व्हेंट), द्वितीय– चिन्मय (आयकॉन पब्लिक स्कूल), तृतीय– स्वर्ण रमेश बोल्ही (भाऊसाहेब फिरोदिया स्कूल), उत्तेजनार्थ– पूजा योगेश ताटी (विवेकानंद स्कूल), मालकर (सेक्रेडहार्ट कॉन्व्हेंट).

इयत्ता सहावी ते दहावी (वरिष्ठ गट)– प्रथम– आर्या (एसएनबीपी), द्वितीय– सोम्या सचिन जाधव (कर्नल परब), तृतीय– अपूर्वा नांदूरकर (सेंट थिवलानंद), उत्तेनार्थ– आरुष हेमंत विटणकर (आयकॉन पब्लिक स्कूल), कीर्ती मनोज पवार (अशोकभाऊ फिरोदिया).

भारतीय राज्य पेन्शनर्स महासंघाची अहिल्यानगर जिल्हा शाखेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

भारतीय राज्य पेन्शनर्स महासंघाची अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणी जाहीर

नगर – भारतीय राज्य पेन्शनर्स महासंघाची अहिल्यानगर जिल्हा स्तरावरील बैठक नुकतीच सावेडी येथील ज्येष्ठ नागरिक मंचाच्या सभागृहात जिल्हा अध्यक्ष सर्वोत्तम क्षीरसागर यांचे अध्यक्षेत पार पडली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी किसनराव लवांडे, राज्याचे अध्यक्ष उदय भावठणकर, सरचिटणीस राम ज. शिंदे, कोषप्रमुख विलासराव पाठक, संस्थापक सदस्य अशोकराव भोंग, सचिव अनंत कुलकर्णी तसेच महासंघाचा सभासद वर्ग उपस्थित होते. शरद कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर अनंत कुलकर्णी यांनी आभार मानले. डॉ. अशोक काळे यांनी सूत्रसंचलन केले.

निवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्यांसोबतच सामाजिक बांधिलकीतून काही उपक्रम राबवण्याचे हेतूने या महासंघाची स्थापना झालेली असून भारतातील सोळा राज्यांमधून कामकाज सुरु झालेले आहे अशी माहिती राज्याचे अध्यक्ष श्री.भावडणकर यांनी दिली.

विविध खात्यातील निवृत्त अधिकारी व कर्मचारी बंधू भगिनींनी राज्य तसेच केंद्रीय स्तरावर महासंघाचे सभासदत्व घ्यावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे पार पडलेल्या पहिल्या राज्य स्तरीय अधिवेशनात मांडल्या गेलेल्या ठरावावर तसेच सभासदांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांवर यावेळी चर्चा झाली.

श्री.भावडणकर यांनी यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यासाठीची नूतन कार्यकारिणी जाहीर केली. त्यामध्ये सर्वश्री सर्वोत्तम क्षिरसागर (अध्यक्ष), अनंत कुलकर्णी (सचिव), लक्ष्मिराज जिंदम (कोषप्रमुख) तसेच मधुकर मुळे, शशिकांत गडकर, रघुनाथ वाघ यांचा समावेश करण्यात आलेला आहे. किसनराव लवांडे, अशोकराव भोंग, राम शिंदे, विलास पाठक यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कु. कृष्णाई कुलकर्णी या खेळाडूने ४०० मी फ्री स्टाईल या क्रीडा प्रकारामध्ये पुणे विभागामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त करून तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करताना ॲड. किशोर देशपांडे. (छाया–उदय जोशी)

श्री समर्थ'ची कृष्णाई कुलकर्णी राज्यस्तरावर स्पर्धेसाठी निवड

नगर – क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र पुणे यांचे अंतर्गत घेण्यात आलेल्या पुणे विभागीय जलतरण स्पर्धा पुणे येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेत येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला सावेडी विभागातील खेळाडू कु. कृष्णाई कुलकर्णी या खेळाडूने ४०० मी फ्री स्टाईल या क्रीडा प्रकारामध्ये पुणे विभागामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडाशिक्षक पोपट लोंढे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, प्रशालेच्या प्राचार्या श्रीमती संगिता जोशी, पर्यवेक्षक सुनिल कानडे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व खेळाडू यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

नगरसेवक पदाची भूमिका सक्षमपणे पार पडली

मनोज दुल्लम यांचे प्रतिपादन

नगर – प्रभागामध्ये काम करीत असताना नागरिकांना बरोबर घेऊन त्यांच्या सूचनेनुसार प्रश्न मार्गी लावले जात आहे. नागरिकांनी मोठया विश्वासने नगरसेवक पदावर काम करण्याची संधी आम्हाला दिली ती आम्ही सक्षमपणे पार पाडली आहे. महापालिकेच्या माध्यमातून प्रभागाच्या विकास कामासाठी मोठ्या निधी उपलब्ध करुन देत, नियोजनबद्ध व कायमस्वरुपी विकास कामे मार्गी लागत आहे. प्रभागातील नागरिकांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी श्रमिक नगर येथे महापालिकेच्या माध्यमातून दवाखान्याची निर्मिती होत आहे. नागरिकांच्या अडीअडचणीच्या व सुखदुःखाच्या काळामध्ये सहभागी होऊन काम करत असतो सहकारनगर येथील ओपन स्पेसचा अनेक वर्षाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार असून त्याचे सुशोभीकरणाचे काम सुरू झाले असल्याचे प्रतिपादन मनोज दुल्लम यांनी केले.

सहकारनगर येथे माजी नगरसेवक मनोज दुल्लम यांच्या प्रयत्नातून ओपन स्पेस कामाचे भूमिपूजन करताना ज्येष्ठ नागरिक डी.एम. कुलकर्णी. समवेत मनोज दुल्लम, उदय कराळे आदी.

सहकारनगर येथे ओपन स्पेस कामाचे भूमिपूजन

सहकारनगर येथे माजी नगरसेवक मनोज दुल्लम यांच्या प्रयत्नांतून ओपन स्पेस कामाचे भूमिपूजन ज्येष्ठ नागरिक डी.एम कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी मनोज दुल्लम, उदय कराळे, नितीन शेलार, सुनील खरपे, श्रीराम कुलकर्णी, धनंजय तागडे, शेखर खटावकर, संजय काकडे, गणेश शिंदे, प्रशांत उरणकर, गणेश कुसळकर, प्रा.रवींद्र काळे, सत्येंद्र गाडे, सागर येमुल आदीसह नागरिक उपस्थित होते

धनंजय तागडे म्हणाले की, सहकारनगर येथील ओपन स्पेसचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता. या ठिकाणी अक्षरशः कचराकुंडी झाली होती, त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली होती. नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. प्रभाग क्रमांक ५ चे नगरसेवक मनोज दुल्लम यांनी लक्ष घालून ओपन स्पेस सुशोभीकरण कामासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे, त्यामुळे सहकार नगरचा अनेक वर्षाचा प्रश्न मार्गी लागला असल्याचे ते म्हणाले

पुरस्काराच्या माध्यमातून चांगल्या कामाची प्रेरणा व ऊर्जा मिळते

सकल ब्राह्मण समाज महासंघाच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांना नगर भूषण पुरस्काराने सन्मानित

नगर – शहरांमध्ये विकासाचे चांगले काम उभे केले असल्यामुळेच नगरकरांचा विश्वास संपादन केला आहे त्या माध्यमातून एकमेकांशी ऋणानुबंध निर्माण झाले असल्यामुळे सर्व जाती धर्मातील लोक बरोबर आले. सकल ब्राह्मण समाज महासंघाने मी केलेल्या विकास कामावर विश्वास ठेवून मला नगरभूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे यामुळे माझी जबाबदारी वाढली असून अजून जोमाने शहर विकासासाठी काम करेल. पुरस्काराच्या माध्यमातून चांगल्या कामाची प्रेरणा व उर्जा मिळत असते. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपण सर्वजण मिळून विकसित शहर निर्माण करू, ब्राह्मण समाजाला महापालिकेच्या माध्यमातून भगवान श्री परशुराम यांचे भव्य मंदिर उभा करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. धार्मिकतेच्या माध्यमातून समाज एकवटला जात असतो. चांगल्या विचाराच्या पाठीमागे ठामपणे उभे राहावे लागते. शहरामध्ये चांगले वातावरण असून सर्वजण गुण्या गोविंदाने एकत्र राहून काम करत आहे, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केल्याबद्दल समस्त ब्राह्मण समाज महासंघाच्यावतीने आ. संग्राम जगताप यांना नगर भूषण पुरस्काराने सन्मानित करताना श्री समर्थ भक्त मंदारबुवा रामदासी. समवेत सुशिल कुलकर्णी, राजाभाऊ पोतदार इतर. (छाया–लड्डू दळवी)

महायुती सरकारच्या वतीने भगवान श्री परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केल्याबद्दल सकल ब्राह्मण समाज महासंघाच्या वतीने सन्मान सोहळ्या आयोजन करण्यात आले होते.

यावेळी संग्राम जगताप यांना नगर भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी श्री समर्थ भक्त मंदार बुवा रामदासी, सुशील कुलकर्णी, दीपक रणनवरे, समाज रत्न पुरस्कार सन्मानार्थ विश्वजीत देशपांडे, इश्वर दीक्षित, अशोक वाघ, विजया अवस्थी, बाजीराव धर्माधिकारी, मकरंद कुलकर्णी, शामराव कुलकर्णी, संजीवनी पांडे, बलवंत नाईक, धनंजय कुलकर्णी, श्रीकांत जोशी, रत्नाकर देशमुख, विजया कुलकर्णी, राजेंद्र पोद्दार, सकल ब्राह्मण समाज महासंघाचे अध्यक्ष राजाभाऊ पोतदार, सुनील रामदासी, कालिंदी केसकर, दत्तोपंत पाठक गुरू, एन. डी कुलकर्णी, अनिल मुरकुट्टे, केतन क्षीरसागर, बाळासाहेब पवार, शिवाजी चव्हाण, माणिकराव विधाते, विजय देशपांडे, प्रमोद कुलकर्णी, योगेश दाणी, किरण वैकर, मोरेश्वर मुळे, नंदकुमार पोळ, प्रभाताई भोंग, श्रीगोपाल जोशी, राम पारीख, नरेंद्र क्षोत्री, प्रशांत मालोत्रा, नचिकेत रसाळ, प्रिया जानवे, निसळ गुरू, श्रिया देशमुख, सार्थक भोंग आदी उपस्थित होते.

टाकळी ढोकेश्वर व नगरमध्ये १७ ऑक्टोबर रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबीर

नगर – पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे १७ ऑक्टोबर रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे दुपारी १२.३० ते १.३० यावेळेत तर नगरमध्ये सिटी केअर हॉस्पिटल येथे दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसारसे यांनी दिली.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणामकारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात आवर्जून तपासणी करून घ्यावी.

टाकळी ढोकेश्वर येथील शिबिराच्या नाव नोंदणीसाठी ७०२०४४८३७४, ९०१११११६३३ या मोबाईल क्रमांकावर तर नगरमधील शिबिरासाठी ९२०९६३२५०२, ७३८५१९५९६२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अन्नाची नासाडी : सामाजिक गुन्हा

(जागतिक अन्न दिनानिमित्त विशेष लेख)

१६ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक अन्न दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात विविध दिन उत्साहात साजरे केले जातात. त्यापैकी अन्न दिन महत्वाचा मानावा लागेल, कारण त्याचा थेट मानवी जीवनाच्या आस्तित्वाशी संबंध आहे. अन्न सुरक्षेबाबतची एकंदर परिस्थिती पाहता अन्न दिनाबाबत जागरूकता वाढीस लागण्याची गरज आहे. परंतु आजही आपण अन्न सुरक्षेबाबत आणि अन्नाच्या नासाडी बाबत गंभीर नाहीत असेच म्हणावे लागेल.

अन्न हे पूर्णब्रह्म आहे अशी आपली संस्कृती सांगते पण ही संस्कृती आपण विसरत चालली आहे की काय असा प्रश्न पडावा असा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम आणि भागीदार संस्था डब्ल्यूआरएपी चा अहवालानुसार आपल्या देशात दरवर्षी ६८ दशलक्ष टन धान्याची नासाडी केली जाते. यातील ६१ टक्के अन्न घरातून, २६ टक्के अन्न सेवांमधून तर १३ टक्के अन्न किरकोळ क्षेत्रात वाया जाते. भारतासारख्या कृषिप्रधान देशात इतक्या मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाणे ही भूषणावह बाब नाही. भारतासारख्या विकसनशील देशात जिथे दरवेळ सात टक्के लोक उपाशी किंवा अर्धपोटी झोपतात तिथे अन्नाची अशी नासाडी परवडणारी नाही. वाया जाणारे हे अन्न जर गोरगरिबांच्या, मुकेल्यांच्या मुखात पडले तर देशात कोणीही उपाशी झोपणार नाही पण आपल्याला आपल्या संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. आपल्याला हवे तेवढेच अन्न पानात काढून घ्यायचे आणि तेवढेच खायचे अशी आपली परंपरा आहे. खाऊन माजावे पण फेकून माजू नये अशी आपली आजी सांगायची हेही आपण विसरून गेलो आहोत.

पाश्चात्य देशात हॉटेलातही पानातले अन्न टाकणे हा सामाजिक गुन्हा मानला जातो. मुकेले व्याकुळ झालेल्या लोकांची आठवणही अन्न टाकून देणाऱ्या या सोकावलेल्या श्रीमंतांना येत नाही. अन्नाची नासाडी हा सामाजिक गुन्हा आहे याचे भान अन्न टाकून देणाऱ्या श्रीमंतांना राहिले नाही. पोटातील मुकेची आग भागवण्यासाठी देशातील कोट्यवधी लोक भीक मागतात. आदिवासी, दुर्गम भागात आजही लाखो लोक पुरेसे अन्न मिळत नाही म्हणून कुपोषित आहेत तर दुसरीकडे दरशेळ लाखो टन अन्न फेकून दिले जाते ही विसंगती बदलायला हवी. वाया जाणारे हे अन्न गोरगरिबांच्या मुखात पडेल अशी व्यवस्था असायला हवी.

हैदराबाद, चेन्नई, दिल्ली, कोलकाता, मुंबई, बंगळुरु यासारख्या मोठ्या शहरात हॉटेल, रेस्टॉरंट, घरात उरलेले अन्न गरिबांना मिळावे यासाठी कम्युनिटी किचन ही संकल्पना अमलात आणली गेली. या संकल्पनेनुसार शहरातल्या विविध भागातल्या रस्त्यावरच्या कम्युनिटी किचनच्या केंद्रातल्या मोठ्या फ्रीजमध्ये उरलेले अन्न ठेवले जाते. मुलेल्यांनी ते काढून घ्यावे अशी सुविधा या केंद्रात आहे पण ही संकल्पना शहरातील मोठ्या शहरातच आहे, ती ही व्यापक नाही. कम्युनिटी किचन सारखी संकल्पना प्रत्येक शहरात व्यापक स्वरूपात राबवायला हवी म्हणजे वाया जाणारे अन्न भुलेल्यांच्या मुखात जाईल आणि अन्नाची नासाडीही थांबेल.

धार्मिक कार्याने परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले

माजी सभापती गणेश कवडे यांचे प्रतिपादन; नालेगांव येथील श्री साईबाबा मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त किर्तन महोत्सवाची सांगता

नगर – २१ वर्षापुर्वी वाघमाही येथे श्री साईबाबा मंदिराची निर्मिती करण्यात आली. दरवर्षी मंदिराचा वर्धापन दिन हा मोठया उत्साहात साजरा केला जातो. दरवर्षी विविध किर्तनकार – प्रवचनकार या ठिकाणी आपली सेवा देत असतात. कोजागिरी पौर्णिमेला या सप्ताहाची सांगता होते. भाविकांच्या प्रतिसादामुळे दिवसेंदिवस मंदिराच्या लौकिकात भर पडत आहे. किर्तन महोत्सवासह विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. सर्वच्या सहकार्याने हा सोहळा मोठया दिमाखात साजरा झाल्याचे समाधान आहे, असे प्रतिपादन मनपा स्थायी समिती माजी सभापती गणेश कवडे यांनी केले.

नालेगांव येथील श्री साईबाबा मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित किर्तन महोत्सवाची सांगता कल्याची दहिहंडी ह.भ.प. जंगले महाराज शास्त्री यांच्या हस्ते फोडण्यात आली.

नालेगांव येथील श्री साईबाबा मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित किर्तन महोत्सवाची सांगता कल्याची दहिहंडी ह.भ.प. जंगले महाराज शास्त्री यांच्या हस्ते फोडण्यात आली. याप्रसंगी आयोजक गणेश कवडे, शहरप्रमुख संभाजी कदम, संजय शेंडगे, बाळासाहेब बोराटे, शाम नळकांडे, सुरेश तिवारी, अशोक दहीफळे, सरपंच राम नाना साके, सचिन सातपुते, अशोक महाराज जाधव, मनुवीर अग्रवाल, संतोष पठाडे, गोवर्धन नळकांडे, रघुनाथ लांडे, प्रभाकर वाघमारे, जयंत वाघ, राजकुमार चिंतामणी, दिपक चत्तर, मनोहर शिंदे आदि उपस्थित होते.

यावेळी हभप जंगले महाराज शास्त्री यांनी भगवंत नामाने जीवनातील दुःख कमी होऊन आनंद निर्माण होत असते. हेच संतांनी मनुष्याचे जीवन सुखी–समृद्ध होण्यासाठी आपल्या सत्वचनातून मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या वचनांप्रमाणे मनुष्याने वाटचाल केल्यास कोणत्याही प्रकारच्या अडचणी येत नाही. भक्ती केवळ श्रवणांनदासाठी नसून ती तर ईश्वराची ओळख झाल्यानंतर हृदयापासून केली जाणारी प्रक्रिया आहे. साईबाबा हे नगरच्या पावनभुमीतील असल्याचे हे आपले भाग्य आहे. आज या ठिकाणी साईबाबा मंदिराचा २२ वा वर्धापन दिन साजरा होत आहे, दीर्घकाळ साईबाबांच्या सेवेत असणाऱ्या भाविकांची भक्ता नक्कीच फळास येईल, असे मौलिक विचार मांडले.

याप्रसंगी अशोक महाराज जाधव म्हणाले, नालेगांव येथील साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. शिर्डीचे साईबाबा हे सर्वांचे मोठे श्रद्धास्थान आहे. साईबाबा मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त किर्तन महोत्सव भाविकांसाठी मोठी पर्वणी ठरली असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी संभाजी कदम, बाळासाहेब बोराटे, शाम नळकांडे आदिंही मंदिराच्या वर्धापन दिनास शुभेच्छा देऊन उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी अन्नदाते संतोष पठाडे, गोवर्धन नळकांडे, रघुनाथ लांडे, प्रभाकर वाघमारे, जयंत वाघ, राजकुमार चिंतामणी, दिपक चत्तर, मनोहर शिंदे आदिंचा सत्कार करण्यात आला. समाह यज्ञस्वीतेसाठी ज्ञानेश योग आश्रम (डोंगरगण), ह.भ.प.श्री भागवत महाराज जंगले, ह.भ.प.महेश महाराज मडके, ज्ञानेश्वर वाघ, कारंजा तरुण मंडळ, श्री साई प्रतिष्ठान, वाघ गल्ही नालेगांव ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. महाप्रसादाने सांगता झाली.

प्रयास ग्रुप सावेडी शाखेच्या अध्यक्षपदी रजनी भंडारी यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना संस्थापिका अलकताई मुंदडा. समवेत नवीन पदाधिकारी आदी.

प्रयास ग्रुप सावेडी शाखेच्या अध्यक्षपदी रजनीताई भंडारी

नगर – प्रयास ग्रुपच्या सावेडी शाखेच्या अध्यक्षपदी रजनी भंडारी यांनी बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थापिका अलकताई मुंदडा यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. तर उपाध्यक्ष अनिता काळे, उषा सोनी, सचिव हिरा शहापुरे, रेखा फिरोदिया यांची निवड करण्यात आली. प्रयास ग्रुप आणि नम्रता दादी नानी ग्रुप यांचा ३१ वा वर्धापन दिन कार्यक्रमात हा सत्कार सोहळा पार पडला.

वर्धापन दिन कार्यक्रमात विविध गेम, प्रश्नमंजुषा यांनी कार्यक्रम भरपूर रंगला व महिलांनी खूप बक्षीस मिळवली. कार्यक्रमात आजपर्यंत ज्यांनी ज्यांनी आपली योगदान दिले आहे त्यांचे कौतुक व सत्कार करण्यात आले. कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी ग्रुपचा वर्धापन दिन असतो. कोजागिरी पौर्णिमा म्हणजे शिवशक्तीचा व कर्तृत्वाचा जागर आहे, स्त्री ने आपल्या स्वतःच्या क्षमता ओळखाव्यात आणि आपण स्वतःला सिद्ध करावे असे डॉ. वृषाली कवळे यांनी सांगितले.

३० वर्षापासून केल्या जात असलेल्या सामाजिक कार्याचा विद्यातार्थ बडवे यांनी आढावा घेतला. यावेळी दादी नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयताई गायकवाड, डॉ. वृषाली कवळे, मीनल खेडकर, सावेडी ग्रुपच्या अध्यक्षा रजनी भंडारी, अनिता काळे, उषा सोनी, हिरा शहापुरे, रेखा फिरोदिया, जयश्री पुरोहित, ग्रुपच्या संस्थापिका अलकताई मुंदडा, सह्लागार विद्या बडवे, सविता गांधी, मेघना मुनोत, वंदना गारुडकर, राखी जाधव, नीलिमा पवार, ज्योती गांधी, उषा सोनटक्के, प्रतिभा भिसे, सोहनी पुरनाळे, सुजाता पुजारी, अर्चना बोरुडे, उज्वला थरा, आरती थोरात, ज्योत्स्ना कुलकर्णी, शशिकला झरेकर, शकुंतला जाधव, आशा गायकवाड, साधना भळगट, ममता दाणी आदी उपस्थित होत्या. बौद्धिक गेम दीपा मालू यांनी घेतले. डॉ. वृषाली कवळे यांनी महिलांना १० पैठणी बक्षीस दिल्या. सूत्रसंचालन दिपाली दाऊतकर व सारिका कासट यांनी केले. आभार विद्या बडवे यांनी मानले.

नगर येथील आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या आरोग्य मंदिरात रुग्णसेवेसाठी भंडारी परिवारातील दुसऱ्या पिढीचे योगदान

आशाबाई भंडारी यांचे प्रतिपादन; गरजू रुग्णांची मोफत कॅन्सर तपासणी, विविध प्रकारच्या थेरपी व उपचार अल्पदरात उपलब्ध

नगर – व्याधीने ग्रासलेल्या दीन–दुबळ्या रुग्णांना आनंदऋषीजी हॉस्पिटल नवजीवन देण्याचे काम करीत आहे. आरोग्य शिबिर घेऊन सर्वसामान्यांना आधार दिला जात आहे. सर्वसामान्यांच्या व्याधी मुक्तीसाठी रुग्णसेवेच्या आरोग्य मंदिरात रुग्णसेवेसाठी भंडारी परिवारातील दुसऱ्या पिढीचे योगदान सुरु असल्याचे प्रतिपादन आशाबाई भंडारी यांनी केले.

श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये डॉ. आशिष भंडारी व भंडारी परिवाराच्यावतीने आयोजित मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना आशाबाई भंडारी.

जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये डॉ. आशिष भंडारी व भंडारी परिवाराच्यावतीने आयोजित मोफत कॅन्सर तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी आशाबाई भंडारी बोलत होत्या. याप्रसंगी, कांतीलाल भंडारी, डॉ. आशिष भंडारी, पायल भंडारी, भागचंद भंडारी, छाया भंडारी, विलास चेंगडे, सुनील गुगळे, किरण भंडारी, काच्या भंडारी, आदित्य भंडारी, डॉ. वसंत कटारिया, सीए आयपी अजय मुथा, डॉ. प्रकाश कांकरिया, प्रकाश छल्लाणी, मानकचंद कटारिया, सुभाष मनोत, वसंत चोपडा, कॅन्सर सर्जन डॉ. अनिकेत शिंदे आदी उपस्थित होते.

पुढे आशाबाई भंडारी म्हणाल्या की, स्व. डॉ. पोपटलाल भंडारी यांनी मिरजगाव येथे ३० वर्ष आरोग्य सेवा दिली. पंचक्रोशीतील फॅमिली डॉक्टर म्हणून त्यांची ख्याती होती. त्यानंतर ते आनंदऋषीजी हॉस्पिटलचे पहिले डॉक्टर म्हणून रुजू झाले. त्यांच्या स्वर्गवासानंतर आमचा मुलगा डॉ. आशिष भंडारी हे रुग्णसेवेचा वारसा पुढे चालवत आहे. हॉस्पिटलच्या पायाभरणीपासून भंडारी परिवार या हॉस्पिटलचा अविभाज्य अंग बनला आहे. भंडारी परिवारावर कायम आचार्य श्रींची कृपा व प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी महाराज यांचे आशिर्वाद असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात डॉ. वसंत कटारिया म्हणाले की, हॉस्पिटल चालवणे अत्यंत अवघड काम असून, यामध्ये एकही घडलेली चूक एखाद्याच्या जीवावर बेतू शकते. मात्र आनंदऋषी महाराजांच्या आशिर्वादाने डॉ. आशिष भंडारी सर्व हॉस्पिटलचे व्यवस्थापन उत्तमपणे बघते आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हॉस्पिटलची प्रगती झपाट्याने सुरु असून, विविध विभाग कार्यान्वीत होऊन दर्जेदार आरोग्यसेवा सर्वसामान्यांना मिळत आहे. त्यांचे वडील दखेील चांगले डॉक्टर होते, त्यांनी हॉस्पिटलच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचे योगदान दिले. हॉस्पिटलच्या उभारणीपासून भंडारी परिवाराचे योगदान राहिले असल्याचे त्यांनी सांगितले.

अजय मुथा म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून सुरु असलेला मानवसेवेचा वसा भंडारी परिवार पुढे घेऊन जात आहे. डॉ. आशिष भंडारी सर्व यंत्रणा हातात्मुन निष्ठेने कार्य करत असून, हॉस्पिटलचा कणा म्हणून त्यांची भूमिका व योगदान आहे. सर्वसामान्यांना आणा देण्यासाठी हॉस्पिटलमध्ये कॅन्सर सारखा महत्त्वाचा विभाग सुरू झाला आहे. या विभागात तज्ञ डॉक्टर व अद्यावत आरोग्य यंत्रणा सेवेसाठी सज्ज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. अनिकेत शिंदे म्हणाले की, हॉस्पिटलमध्ये कॅन्सर रुग्णांसाठी केमोथेरपी व रेडिएशनची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. काही महिन्यातच हा विभाग सुरुळा आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून सेवा देत असून, अनेक रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. कॅन्सर झाले म्हणजे मनुष्याचे जीवन संपत नाही, त्याचे वेळेवर निदान होऊन योग्य उपचार झाल्यास तो व्यक्ती बरा होत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. प्रकाश कांकरिया यांनी या मानवतेच्या मंदिरात शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेऊन रयतेच्या आरोग्यासाठी डॉ. आशिष भंडारी योगदान देत असल्याची भावना व्यक्त केली. आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले. या शिबीरात ६६ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. गरजेनुसार रुग्णांवर विविध प्रकारच्या थेरपी व उपचार अल्पदरात केल्या जाणार आहेत. तर महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचार मोफत होणार आहे.

कृतीतून प्रामाणिकपणे केलेले काम ही एक प्रकारे देशसेवाच आहे

डॉ. जहीर मुजावर यांचे प्रतिपादन; अलकरम हॉस्पिटलतर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर

नगर – आपला देश हा सर्वधर्म समभाव असलेला देश आहे. या देशात सर्व जाती–धर्मांचे लोक गुण्या–गोविंदाने एकत्र राहत आहेत. अशा महान देशात आपण राहत असल्याचे आपणास अभिमान असला पाहिजे. देश आपल्यासाठी काय करतो, यापेक्षा आपण देशासाठी काय करतो याचा विचार होणे महत्वाचे आहे. आपल्या कृतीतून आपल्या व्यवसाय, नोकरीतून प्रामाणिकपणे केलेले काम ही एक प्रकारे देशसेवाच आहे. आपली भावी पिढी सुजान व सक्षम होण्यासाठी त्यांना शिक्षण, आरोग्य आदि मुलभूत गरजा मिळाल्या पाहिजे, असे प्रतिपादन अलकरम हॉस्पिटलचे डॉ. जहीर मुजावर यांनी केले.

अलकरम हॉस्पिटलतर्फे आयोजित मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात रुग्णांची नेत्रतपासणी करताना डॉक्टर.

अलकरम हॉस्पिटल एक्सरे लॅब सोनोग्राफी सेंटर व मेटरनिटी नर्सिंग होम्च्यावतीने व आनंदऋषी नेत्रालय च्या सहकार्याने स्वतंत्रता सेनानी सरसैय्यद अहमद खान यांच्या जयंतीनिमित्त मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी अनेक रुग्णांनी अपल्या मोफत तपासण्या करुन अल्प दरात शस्त्रक्रियेसाठी नाव नोंदणी केली.

रुग्णांना अल्प दरात नंबरचे चष्मेही वाटप करण्यात आले. याप्रसंगी डॉ. जहीर मुजावर, डॉ.अभिषेक चव्हाण, डॉ. किरण कवडे, शफकत सय्यद, शेरअली शेख, तौफिक तांबोली, आबीद दुलेखान आदि उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ जहीर म्हणाले की, ज्या पद्धतीने निसर्गातील विविध वस्तू या जगात कही ना कही मोलाचे समजोपयोगी कार्य नैसर्गिकरित्या करत असते व त्या मोबदल्यात कुठलीही अपेक्षा बाळगत नाही. जसे एखादे मोठे झाड आपल्याला सावली देते, ऑक्सिजन देते, फळ, फुल देते तसेच मनुष्यजन्मी समाजाला आपण काही देणे लागतो, या प्रामाणिक भावनेतून आपण काम केल्यास, निश्चित चांगले यश प्राप्त होते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबीद दुलेखान यांनी केले. तर आभार शेरअली शेख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अलकरम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या सर्व सभासदांनी परिश्रम घेतले.

सीबीएसई नॅशनल एरोबिक्स चॅम्पियन स्पर्धेत अहिल्यानगर येथील जीत जाखोटीया प्रथम

नगर – अहिल्यानगर येथील जीत मुकुंद जाखोटिया याने भारतीय विद्या निकेतन, ग्वालियर, मध्यप्रदेश येथे झालेल्या सीबीएससी नॅशनल एरोबिक्स चॅम्पियन २०२४–२५ स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत भारतातील १५१ राज्यामधील १०४ शाळेतील ८५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये जीत जाखोटीया याने राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले आहे.



अहिल्यानगर येथील जीत मुकुंद जाखोटिया याने भारतीय विद्या निकेतन, ग्वालियर, मध्यप्रदेश येथे झालेल्या नॅशनल एरोबिक्स चॅम्पियन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. यावेळी अध्यक्षांच्यावतीने मेडल देऊन सत्कार करण्यात आला.

त्याला या स्पर्धेसाठी शितल गांधी, प्रणव गांधी, पलक गांधी, सायली गांधी यांचे प्रशिक्षण लाभले.

तो पोद्दार इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल, अहिल्यानगरचा इयत्ता सहावीचा विद्यार्थी असून बालकिशन जाखोटीया यांचा नातू आहे.

केडगावच्या अरिहंत फार्मसी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा प्रसंगी माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन करताना विद्यार्थी, प्राचार्य डॉ. योगेश बाफना, प्राध्यापक वर्ग.

अरिहंत फार्मसी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

नगर – केडगाव, सोनेवाडी रोड येथील अरिहंत फार्मसी महाविद्यालयात १५ ऑक्टोबर रोजी माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली.

आजचे युग हे सोशल मीडिया चे युग आहे आणि त्यामुळे आजची युवा पिढी ही वाचन संस्कृती पासून दूर होऊ लागली आहे. परंतु पुस्तके ही आपल्या जीवनाचा आमूलाग्र भाग आहेत त्यांच्या वाचनाने आपल्या ज्ञानात भर पडून आपले भविष्य उज्वल होण्यास निश्चितच मदत होईल त्यामुळे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त पुस्तकांचे वाचन करावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांनी केले.

या कार्यक्रमाच्या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेश बाफना, उपप्राचार्य प्रा. आव्हाड वर्षागणी, ग्रंथपाल सौ.अपर्णा पंडित, प्रा. फंड स्नेहल, प्रा. गलगट कांचन, सहाय्यक ग्रंथपाल गटणे धनश्री, योगेश पंडित तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थीवृंद उपस्थित होते.

सुवालाल गुंदेचा यांचे दूरदृष्टीचे विचार कायम प्रेरणादायी

संतोष गांधी यांचे प्रतिपादन; जैन ओसवाल पतसंस्थेत स्व.सुवालालजी गुंदेचा यांना ६ व्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

नगर – समाजाच्या व्यापक हिताचा विचार आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व मिळाले तर आर्थिक संस्था सातत्याने प्रगती करते. आर्थिक संस्थेत अशा नेतृत्वामुळेच त्या संस्थेप्रती जनसामान्यांमध्ये विश्वासार्हता निर्माण होते. स्व.सुवालाल गुंदेचा यांनी विशिष्ट तत्वप्रणाली आणि शिस्तीने जैन ओसवाल पतसंस्थेची मुहूर्तमेढ रोवून कारभार चालविला. त्यामुळेच २३ वर्षात या संस्थेने गरूडभरारी घेतली आहे. भाऊंची पतसंस्था म्हणजे चोख कारभार अशी प्रतिमा निर्माण झाली आहे. अशा नेतृत्वाचे मार्गदर्शन लाभले हे आमच्याशाठी भूषणावह आहे. संस्थेचे सर्व पदाधिकारी, संचालक, अधिकारी, कर्मचारी यांच्याशाठी भाऊंचे विचार कायम आदर्शवत राहतील, असे प्रतिपादन सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमन संतोष गांधी यांनी केले.

सहकारमहर्षी सुवालाल गुंदेचा यांच्या ६ व्या स्मृतीदिनानिमित्त सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेत त्यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सहकारमहर्षी सुवालाल गुंदेचा यांच्या ६ व्या स्मृतीदिनानिमित्त सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेत त्यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी चेअरमन संतोष गांधी, संचालक मनोज गुंदेचा, शांतीलाल गुगळे, शरद गोयल, ज्येष्ठ सभासद राजेंद्र चोपडा, माजी व्हाईस चेअरमन राजेंद्र गांधी, संजय वखारिया, प्रमोद गांधी, महेंद्र लुणिया, प्रकाश मुथा, किशोर सुरपुरिया, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी, असिस्टंट मॅनेजर नयना बोगावत व कर्मचारी वृंद उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्वांनी भाऊंच्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

राजेंद्र चोपडा म्हणाले, सहकाराचा मूलमंत्र लक्षात घेऊन सुवालाल गुंदेचा यांनी पतसंस्थेची स्थापना केली. सर्वसामान्यांना आर्थिक पत देऊन उद्योग, व्यवसायाला चालना देण्याचे त्यांचे धोरण होते. चांगल्या कारभाराची त्यांची परंपरा विद्यमान संचालक मंडळ पुढे नेत आहे.

राजेंद्र गांधी म्हणाले, सामान्य लोकांची आर्थिक उन्नती हा सहकाराचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सुवालाल गुंदेचा यांनी सहकारी बँकेंग क्षेत्रात योगदान दिले. त्यांच्या सान्निध्यात आम्हाला खूप शिकायला मिळाले. आज संस्थेची नेत्रदीपक प्रगती पाहून अभिमान वाटतो.

पेमराज सारडा महाविद्यालयाच्या 'अय' एकांकिने पटकावला पुरुषोत्तम करंडकमधील भागीरथ करंडक

नगर – पेमराज सारडा महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग हा सातत्यपूर्ण यशदायी कामगिरी करणारा असा आहे. या सांस्कृतिक विभागाला प्रदीर्घ अशी देदीप्यमान परंपरा लाभलेली आहे. महाराष्ट्राच्या एकांकिका विद्यातील अतिशय मानाच्या समजल्या जाणाऱ्या पुरुषोत्तम करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत पेमराज सारडा महाविद्यालयाने सर्वोत्कृष्ट आयोजित संघा साठी दिला जाणारा भागीरथ करंडक पटकावला आहे. तसेच सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून ऋतुराज दंडवते, तर आविष्कार ठाकूर याला अभिनयाचे प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी दिली.

भागीरथ करंडक पटकावणाऱ्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह प्राध्यापक वर्ग.

राज्यात नावाजलेल्या पुरुषोत्तम करंडक नाट्य स्पर्धेत सारडा महाविद्यालय सहभाग घेते दरवर्षी सातत्याने पारितोषिके पटकवत आहे. महाविद्यालयाने यंदाही आपली ही परंपरा कायम राखलेली आहे. यावर्षी पुरुषोत्तम करंडक नाट्य स्पर्धेत महाविद्यालयाच्या वतीने संदीप दंडवते यांनी लिहिलेली 'अय' ही एकांकिका सादर करण्यात आली. ज्यामध्ये एका मुक्या मुलीची कथा आहे. ज्यात लहानपणी तिच्यावर झालेल्या एका अत्याचाराने तिचे संपूर्ण आयुष्य बदलून गेलेले असते आणि ती आता तिचा आवाज शोधू पाहते आहे, या कामी तिला मदत करणारा तिचा नवरा यांची सुंदर कथा गुंफण्यात आलेली आहे. अशी माहिती सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.सत्यजीत पाटील यांनी दिली.

मानाच्या पुरुषोत्तम करंडक स्पर्धेतील या यशाबद्दल महाविद्याह्यायाच्या वतीने नाटकातील सर्व संघाचे अभिनंदन प्राचार्य माहेश्वरी गावित यांनी केले. 'अय' या एकांकिकेमध्ये गौरी देशपांडे आणि आविष्कार ठाकूर हे दोन कलाकार प्रमुख भूमिकेत होते. तर श्रावण शिंदे आणि सुहास मेरगे हे सहकलाकार होते. एकांकिकेचे दिग्दर्शन ऋतुराज दंडवते या विद्यार्थ्याने केले होते. तसेच या सगळ्या टीमला प्रा. प्रसाद बेडेकर यांचे मार्गदर्शन लाभले होते. संघाला मिळालेला भागीरथ करंडक हा सर्वोत्कृष्ट आयोजित संघ म्हणून दिला जातो. ज्यामध्ये संघाचे वर्तन, त्यांची सादरीकरणाची पद्धत आणि एकूणच त्यांचा वर्तन व्यवहार या सर्व गोष्टी पाहिल्या जातात, त्यामुळे भागीरथ करंडक हा एक अतिशय मानाचा करंडक समजला जातो.

सारडा महाविद्यालयाने मिळवलेल्या या यशाबद्दल हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शीरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष अँड.अनंत फडणीस, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे, डॉ. मंगला भोसले, पर्यवेक्षक डॉ.सुजित कुमावत, प्रा.गिरीश पाखरे, डॉ. राजू रिक्कल, प्रबंधक अशोक असेरी यासह सर्व संचालक, प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनच्या होलसेल फटाका विक्री मार्केटचे उद्घाटन करताना आदित्यनाथ महाराज.

नगर–कल्याण रोडवरील होलसेल फटाका मार्केट सुरु

नगर – सालाबाद प्रमाणे दिवाळी सणा निमित्त नगर–कल्याण रोडवर अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनचे वतीने होलसेल फटाका विक्री मार्केटचे उद्घाटन श्रीविशाल गणपती मंदिराचे पुजारी संगमनाथ महाराज यांचे शिष्य श्री आदित्यनाथ महाराज यांच्या हस्ते फीत कापून फटाका विक्री मार्केटचे व प्रवेशद्वाराचे उद्घाटन झाले. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष गजेंद्र राशीनकर, सचिव श्रीनिवास बोज्ञा, उपाध्यक्ष सुरेश जाधव, सहसचिव अविनाश साठे, कोषध्यक्ष शिवराम भगत आदींसह सदस्य उपस्थित होते.

अध्यक्ष राशीनकर म्हणाले, नगर कल्याण रोड वरील फटाका मार्केट हा जिल्ह्यातील एकमेव होलसेल मार्केट असून पूर्ण राज्यात प्रसिद्ध आहे. सर्वात कमी दरात येथे फटाके मिळत असल्याने राज्यातील अनेक जिल्ह्यातील किरकोळ व्यापारी फटाके खरेदीसाठी याच मार्केटवर अवलंबून असतात.

यावेळी असोसिएशनचे माजी अध्यक्ष व सचिव श्रीनिवास बोज्ञा म्हणाले जिल्हा प्रशासनान दरवर्षी प्रमाणे याही वर्षी फटाका विक्रीचे परवाने मिळणे कामी सहकार्य केले असून फटाका असोसिएशनचे वतीने वर्षभर सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन विविध कार्यक्रम राबवत असल्याने प्रशासनही आम्हाला सहकार्य करत आहे.

यावेळी आदित्यनाथ महाराज यांनी कोणताही व्यवसाय हा प्रामाणिकपणे केल्यास यश निश्चित मिळते यासाठी व्यापारी भावना ठेवून व्यवसाय करावा असे आवाहन करून मी सर्वांचा व्यवसाय चांगला होवो यासाठी श्री विशाल गणेश चरणी प्रार्थना करतो असे म्हणून शुभेच्छा दिल्या. शिवराम भगत यांनी प्रास्ताविक केले. अरविंद साठे यांनी आभार मानले. यावेळी असोसिएशनचे सदस्य देवीदास ढवळे, माजी उपाध्यक्ष कैलास खरपूड़े, संजय सुराणा, अमोल तोडकर, दाजी गारकर, संभाजी कराळे, विकास पटवेकर, विजय मुनोत, उमेश क्षीरसागर, सागर हरबा, अविनाश जिदम, अभय बोरुडे उपस्थित होते.



हॉर्स शू बेंड

जगात आनल्याला अनेक नैसर्गिक आश्चर्य पाहायला मिळतात. निसर्गात आपल्याला श्वास रोखून ठेवायला लावणारी अनेक ठिकाणं दिसतात. वरील छायाचित्रही त्यापैकीच एक. ॲरिझोनामधल्या कोलोरॅडो नदीचा आकार या ठिकाणी घोड्याच्या नालेसारखा झाला आहे. म्हणून या ठिकाणाला हॉर्स शू बेंड असं म्हटलं जातं.

कुत्र्यामुळे गर्भपात



कल्पना करा की त्या गर्भवती महिलेचे काय झाले असेल, जिने गर्भवती राहण्यासाठी वर्षानुवर्षे संघर्ष केला आणि दुर्दैवी अपघातात ते गमावले. यान नावाची ही महिला घराबाहेर फिरत असताना एका पाळीव कुत्र्याने तिच्यावर उडी मारली. कुत्र्याच्या अचानक हल्ल्यामुळे महिला घाबरली आणि पडली. त्यामुळे तिला पोटाच्या खालच्या भागात दुखू लागले. नंतर कळले, की तिचा गर्भपात झाला आहे. या घटनेनंतर कुत्र्याच्या मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला. त्याला लाखो रुपये दंड भरावा लागला.

अनेक वेळा सार्वजनिक ठिकाणी पाळीव प्राणी मोकळे सोडल्याने त्याचे परिणाम इतरांना भोगावे लागतात. बीजिंगमधील ४१ वर्षीय यानला शारीरिक दुखापती तसेच गर्भपात झाला, जो कोणत्याही गर्भवती महिलेसाठी अत्यंत क्लेशकारक अनुभव असू शकतो. विशेषतः जेव्हा ती इन विट्रो फर्टिलायझेशन (आयव्हीएफ) सारख्या कठीण आणि खर्चिक प्रक्रियेतून गरोदर राहिली. यानने गेल्या काही वर्षांपासून 'आयव्हीएफ'द्वारे गर्भधारणेचा प्रयत्न केला आणि या वर्षी त्यांना बाळाची अपेक्षा असताना, कुत्र्याने सर्व काही उद्ध्वस्त केले. ती पार्सल घेण्यासाठी घराबाहेर पडली, तेव्हा एका कुत्र्याने तिच्यावर हल्ला केला. चीनी मीडियानुसार, कुत्र्याने अचानक उडी मारल्याने यानला धक्का बसला आणि ती पडली. तिच्या पाठीला दुखापत झाली आणि तिच्या ओटीपोटात दुखू लागले. त्या भयानक क्षणाची आठवण करून देताना यान म्हणाली, की मी चार महिन्यांची गरोदर होते. कुत्र्याच्या हल्ल्यामुळे मी घाबरले आणि खाली पडले. मला पोटात खूप दुखू लागले. ती हॉस्पिटलमध्ये गेली, तेव्हा डॉक्टरांनी सांगितले, की तिच्या मुलाला वाचवता येणार नाही. ती म्हणाली, की मी तीन वर्षांपासून 'आयव्हीएफ' उपचार घेत आहे. आता माझा गर्भपात झाला आहे. माझे मूल गमावल्याने मला खूप दुःख झाले आहे. यानंतर तिने कुत्र्याचा मालक ली यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. चीनमध्ये पाळीव कुत्र्यांना उपद्रवाबद्दल सोडण्याविरोधात कडक कायदा आहे. ही अत्यंत अस्वस्थ करणारी घटना असल्याचे सांगत न्यायालयाने ली यांना ९०,००० युआन (१० लाखांपेक्षा जास्त) देण्याचे आदेश दिले.

कबुतराची किंमत

या जगात कोणाला कशाचं वेड असेल हे सांगता येत नाही. आपली आवडती गोष्ट खरेदी करण्यासाठी माणूस कितीही पैसे खर्च करू शकतो. आता बेल्जियममधल्या एका कबुतराला चीनमधल्या एक इसमाने तब्बल १.२५ दशलक्ष युरो म्हणजे तब्बल ९.६ कोटी रुपये देऊन खरेदी केलं. हे कबुतर युरोपातल्या बर्ड रेसिंग स्पर्धेचं विजेता होतं. 'आमाँडो' असं त्याचं नाव. 'आमाँडो'ने २०१८ मध्ये 'बर्ड रेसिंग' स्पर्धा जिंकली होती. जोएल वर्झूट यांनी हे कबुतर पाळलं होतं. 'आमाँडो'च्या लिलावात एवढे पैसे मिळतील, याची मला अजिबात कल्पना नव्हती असं जोएल सांगतात. त्यांनीच या कबुतरांना स्पर्धेत सहभागी होण्यासंबंधी प्रशिक्षण दिलं. आम ाँडोच्या याच कौशल्याने प्रभावित होऊन दोन चीनी नागरिकांनी त्यांच्याशी संपर्क साधला. आमाँडोच्या लिलावाची प्रक्रिया दोन आठवडे सुरू होती. शेवटच्या तासाभरात त्याच्यावर तब्बल एक लाख युरोंची बोली लागली. दुसऱ्या वेळी त्यात दोन हजार युरोंची वाढ करण्यात आली. त्यानंतर या बोलीचा आकडा १२ लाख ५२ युरोपर्यंत जाऊन पोहोचला आणि कबुतराचा लिलाव संपन्न झाला. जोएल यांच्याकडे जवळपास ५०० पक्षी आहेत. ते या पक्ष्यांचा लिलाव करत असतात. २०१७ मध्येही शिंग वेई नावाच्या चीनी व्यावसायिकाने चार लाख युरो देऊन त्यांच्याकडचं कबुतर विकत घेतलं होतं. जोएल दिवसातले बारा तास या पक्ष्यांसोबत घालवतात. जोएल यांनी प्रशिक्षण दिलेले पक्षी कोणत्याही वातावरणात आणि परिस्थितीत उडू शकतात, असं म्हटलं जातं. 'आमाँडो' पाच वर्षांचा असून आता बर्ड रेसिंग स्पर्धेतून निवृत्त होण्याची त्याची वेळ आली आहे. मात्र त्याचं दिशेचं ज्ञान अगदी पक्कं असल्याचं जोएल सांगतात. गेल्या काही वर्षांत चीनमध्ये बर्ड रेसिंग मोठ्या प्रमाणात वाढलं आहे. त्यामुळे इथले लोक वाड्डेल त्या किंमतीत प्रशिक्षित कबुतरं खरेदी करायला तयार होतात.

लाडक्या बहिणींनी लुटल्या साड्या!



राज्य सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना मोठी चर्चेची आणि लितकीच लोकप्रिय ठरली आहे. राज्य सरकारकडून आत्तापर्यंत तब्बल दोन कोटीपेक्षा जास्त महिलांच्या बँक खात्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा झाले आहेत. त्यामुळे, महिला भगिनींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सरकारकडून दरमहा १५०० रुपये मानधन, ओवळणी मिळत असल्याने महिलांना समाधान वाटते. त्याच पार्श्वभूमीवर राज्य सरकार व महायुतीमधील तिन्ही पक्षांकडून या योजनेच्या निमित्ताने कार्यक्रम मेहिला भगिनींना आकर्षित केले जात आहे. कुठे महिलांसाठी विविध वस्तूंचे वाटप केले जाते, तर कुठे साड्यावाटप होत आहे. कुठे स्वतः मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री भेट देत आहेत. नांदेड जिल्ह्यात लाडक्या बहिणीशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते; मात्र या कार्यक्रमात चांगलाच गोंधळ उडाला. दरम्यान, महिलांची साड्या घेण्यासाठी झुंबड उडाल्याने साड्या वाटप ऐवजी साड्या लुटल्या. नांदेड जिल्ह्यात भाजपच्या वतीने आयोजित कार्यक्रमात चांगलाच फज्जा उडाला. विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपल्याने सर्वच पक्षात श्रेयवादाची चढाओढ लागली आहे. लाडकी बहीण योजनेचे श्रेय घेण्यासाठी महायुतीतील तिन्ही पक्ष एकमेकांना टस्सल देत आहेत. या कार्यक्रमात दोन हजार साड्या वाटप करण्याचे नियोजन आयोजकांकडून करण्यात आले होते; परंतु ऐनवेळी महिलांची संख्या जास्त झाल्याने साडी घेण्यासाठी महिलांची एकच झुंबड उडाली. नियोजनानुसार आयोजकांकडे साड्यांची संख्या कमी पडल्याने या ठिकाणी साड्या घेण्यासाठी महिलांनी गर्दी केली. त्यामुळे साड्या वाटापाऱ्यांचा हा कार्यक्रम आयोजकांना बंद करावा लागला. या वेळी अनेक महिला साड्या न घेताच परत गेल्या. सकाळपासून साड्या घेण्यासाठी महिला तामसा येथे हजर झाल्या होत्या; परंतु साड्या न मिळाल्याने लाडक्या बहिणींचा हिरमोड झाला. ज्या महिलांना साड्या मिळाल्या नाहीत, त्या महिलांनी संताप व्यक्त केला आहे. आम्ही आता साड्या घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे जायचे का, असा सवालही या महिलांनी केला.

कलिडोस्कोप

अजब म्युझियम

तुम्ही विविध वस्तूसंग्रहालयांना भेट दिली असेल. भल्याम ोठ्या परिसरात पसरलेली तीन ते चार मजली इमारतीतली ही वस्तूसंग्रहालयं देश आणि विदेशात मोठ्या प्रमाणावर आहेत. अशा संग्रहालयांमध्ये पुरातन, ऐतिहासिक वस्तू जतन करून ठेवलेल्या असतात. जुनी नाणी, नोटा, राजेमहाराजांच्या तलावारी, इतर शस्त्र, राजमहालातल्या वस्तू असं बरंच काही इथे पहायला मिळतं. मात्र इंग्लंडमधलं एक म्युझियम खूप खास आहे. याचं कारण म्हणजे ते एका टेलिफोन बूथमध्ये साकारण्यात आलं असून जगातलं सर्वात लहान म्युझियम असल्याचं बोललं जातं. टेलिफोन बूथ हा प्रकार काळाच्या ओघात लोप पावला आहे. प्रत्येकाच्या हातात मोबाईल असल्याने एक रुपया किंवा पाउंड टाकून फोन करण्याचा विचारही कोणी करत नाही. त्यामुळे टेलिफोन बूथ इतिहासजमा झाले आहेत. म्हणूनच एका संस्थेने टेलिफोन बूथचं जतन करायचं ठरवलं. पुढच्या पिढीला याचं महत्त्व कळावं यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे. त्यांनी एका टेलिफोन बूथचं रुपांतर म्युझियममध्ये करून टाकलं. 'ब्रिटन टेलिकम्युनिकेशन'ने वापरत नसलेले ४३ टेलिफोन काढून टाकण्याचा निर्णय घेतला होता. मात्र 'वॉरले कम्युनिटी असोसिएशन' नामक संस्थेने त्यांचं जतन करायचं ठरवलं. २००८ पासूनच ही संस्था विविध मार्गांने पैसे जमवून पुरातन वारशाचं जतन करण्याचं काम करते आहे. याच प्रयत्नांतून पश्चिम यॉर्कशायरमधल्या एका टेलिफोन बुथचं रुपांतर म्युझियममध्ये करण्यात आलं. हे म्युझियम अवघ्या ३६ चौरस फूट परिसरात पसरलं आहे. एवढ्या छोट्या जागेत बऱ्याच गोष्टी ठेवण्यात आल्या आहेत. जुने फोटो, दागिने, टेलिफोन बुथचा इतिहास असं बरंच काही इथे पहायला मिळतं. 'द मेपोल इन' असं या संग्रहालयाचं नाव आहे. हे छोटेखानी संग्रहालय पाहण्यासाठी लोकांच्या रांगा लागलेल्या असतात. विशेष म्हणजे दर तीन महिन्यांनी या बूथ म्युझियमध्ये नव्या वस्तू ठेवल्या जातात.



रहा पाण्याखाली

खोल समुद्रात, बाहेरची जलसंपदा न्याहाळत जेवायला किती मस्त बाटेल ना? नॉर्वेमध्ये युरोपमधलं पहिलं पाण्याखालचं म्हणजे अंडरवॉटर रेस्टॉरंट आहे. या देशातल्या बॅलीमध्ये हे रेस्टॉरंट असून इथे ४० लोकांच्या राहण्याचीही व्यवस्था आहे. या ठिकाणी एका वेळी १०० लोक बसून जेवू शकतात. रेस्टॉरंट सुरू झाल्यावर पहिल्याच दिवशी तुफान प्रतिसाद मिळाला. तब्बल ७००० लोकांनी डिनरसाठी ऑनलाईन टेबल बुक केलं. अर्थात वेगवेगळ्या दिवसांसाठी टेबल बुक करण्यात आल्याने कोणालाही नकार द्यावा लागला नाही. ३४ मीटर लांब असलेल्या या रेस्टॉरंटचा पुढचा भाग जमिनीशी जोडलेला आहे तर मागचा भाग पाच मीटर खोल वसलेला आहे. रेस्टोरंटच्या आत काचा लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांना बाहेरचं सौंदर्य, समुद्री जीवन न्याहाळता येतं. अचानक एखादा मासा आपल्या जवळ येऊन जातो. रेस्टॉरंटचा आतला भाग एखाद्या मत्स्यालयासारखा दिसतो. अर्थात हे जगातलं पहिलं पाण्याखालचं रेस्टॉरंट नाही. याआधी मालदीवमध्ये अंडरवॉटर हॉटेल सुरू करण्यात आलं आहे. 'मारुका' नावाच्या या हॉटेलमध्ये राहण्यासाठी चार रात्रींचं पॅकेज घ्यावं लागतं. या पॅकेजची किंमत थोडीथोडकी नाही तर १.४ कोटी रुपये आहे. म्हणजे एक रात्र थांबायचं असेल तर ३६ लाख रुपये भरावे लागतील. पण इथे येणाऱ्या पर्यटकांना पूर्ण पॅकेज घ्यावं लागतं. बराच खर्च असला तरी पाण्याखाली राहण्याचा अनुभव भन्नाट म्हटला पाहिजे.

झाडही अटकेत

माणसांना अटक होते. क्वचित प्रसंगी प्राण्यांच्या अटकेच्या घटना समोर येतात. मात्र निरुपद्रवी झाडाला कोणी अटक करेल का? पाकिस्तानातल्या खैबर पख्तूनख्वा भागातलं एक झाड अटकेत आहे. विशेष म्हणजे गेल्या १२१ वर्षांपासून ते केद्र भोगत आहे. इथल्या वडाच्या झाडाला साखळदंडांनी बांधून ठेवण्यात आलं असून त्यावर आय ॲम अंडर अरेस्ट म्हणजे मी अटकेत आहे असा फलकही लावण्यात आला आहे. खैबर प्रांतातल्या लंडी कोतल परिसरात हे झाड असून ब्रिटिश काळातल्या जुलुमांचं प्रतिक म्हणून आजही त्याला या साखळदंडांमधून मुक्त करण्यात आलेलं नाही. या झाडाच्या अटकेचं कारण जाणून घेण्यासाठी आपल्याला इतिहासात डोकावावं लागेल. भारतावर ब्रिटिशांचं राज्य असताना म्हणजे १८९८ मध्ये ब्रिटिश अधिकारी जेम्स स्वर्चोयंड मद्यपान करून या परिसरात फिरत होता. आपल्या समोर असलेलं वडाचं झाड वेगाने आपल्या दिशेने येत असल्याचा भास त्याला झाला. यामुळे प्रचंड घाबरलेल्या जेम्सने झाड ताब्यात घेण्याचे आदेश ब्रिटिश सैनिकांना दिले. त्यांनीही आपल्या वरिष्ट अधिकाऱ्याच्या आदेशाचं पालन करून झाडाला साखळदंडांनी बांधून टाकलं. १२१ वर्षानंतरही या झाडाची साखळदंडांमधून मुक्तता झालेली नाही. हे झाड ब्रिटिशांनी केलेल्या अनन्वित अत्याचारांचं प्रतिक असल्याचं तिथल्या लोकांचं म्हणणं आहे. त्या काळात ब्रिटिशांनी अनेक क्रूर कायदे केले होते. त्यापैकी एक म्हणजे 'ब्रिटिश राज फ्रेटियर क्राईम्स रेग्युलेशन'. ब्रिटिशांना असलेल्या परदूती लोकांचा विरोध मोडून काढण्यासाठी हा कायदा आणण्यात आला. या अंतर्गत परदूती जातीच्या लोकांना कोणतीही शहानिशा न करता थेट अटक करण्याचा अधिकार ब्रिटिशांना मिळाला होता. महत्त्वाचं म्हणजे या कायद्याचं अस्तित्व आजही या परिसरात आहे. यामुळे इथल्या लोकांचे बरेच अधिकार डावलले गेले आहेत. हा कायदा म्हणजे मानवाधिकाराचं उल्लंघन असल्याचं म्हटलं जातं.

प्रवास जनजागृतीसाठी

आता इलेक्ट्रिकल कारचं उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असलं तरी काही वर्षांपूर्वी असं नव्हतं. याच काळात एका इलेक्ट्रिक कार चालकाने लोकांच्या सहकार्याने तीन वर्षांत ९० हजार किलोमीटरचा प्रवास केला होता. शून्य कार्बन उत्सर्जनाचा संदेश देण्याच्या उद्देशाने बिब वेकर मार्च २०१६ मध्ये घराबाहेर पडला. तेव्हा त्याच्याकडे पुरेसा पैसा नव्हता. मधल्या काळात इलेक्ट्रिक कारच्या दुरुस्तीसाठी त्याने २० हजार युरो म्हणजे जवळपास १५,६२,००० रुपये खर्च केले. बिबने यापैकी काही पैसे लोकांच्या मदतीने तर काही काम करून मिळवले. या इलेक्ट्रिक कारमधून बिबने नॉर्वे ते इराण आणि म्यानमार ते संयुक्त अरब अमिरात असा प्रवास केला. या प्रवासाची अखेर ऑस्ट्रेलियातल्या सिडनीमध्ये झाली. या प्रवासाचा नेमका खर्च सांगणं कठीण असल्याचं बिब सांगतो. मात्र या दरम्यान जेवण आणि राहण्याची सोय फुकट झाल्याचंही तो सांगतो. या काळात बिबची अनेकांनी मदत केली. मध्यपूर्व तसंच भारतातल्या काही असुरक्षित भागातही तो गेला. मात्र प्रत्येक ठिकाणच्या स्थानिकांची त्यांचं स्वागत केलं आणि पूर्ण सहकार्यही केलं. शक्य तिथे त्याला गाडी स्वतः चालवली. काही ठिकाणी त्याल गाडी बोटीने पाठवावी लागली. पैसे जमवण्यासाठी कामही केली. या दरम्यान त्याला बऱ्याच अडचणींना सामोरं जावं लागलं. भारतात गाडीच्या मागचे टायर खराब झाले तर इंडोनेशियामध्ये गाडीत पाणी शिरलं. गाडीच्या दुरुस्तीचं काम हॉलंडमधले मॅकेनिकच करू शकत होते. क्राउड फंडींगच्या माध्यमातून त्याने जवळपास पाच हजार युरो म्हणजे चार लाख रुपये जमवले. कार्बनचं उत्सर्जन कमी



सर्जिकल ब्लेड पोटात राहिल्याने मृत्यू

एका गर्भवती महिलेचा बाळंतपणात मृत्यू झाला. कुटुंबीयांनी तिच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार केले; पण दुसऱ्या दिवशी ज्या वेळी मृत महिलेचा पती मृतदेहाची राख घेण्यासाठी गेला, त्या वेळी त्याला धक्का बसला. मेरठमधली ही घटना आहे. मेरठमधल्या हस्तिनापूर भागातील राठोरा खुर्द गावातील ही घटना आहे. इथे राहणाऱ्या संदीप या तरुणाची पत्नी नवनीत कौर गरोदर होती. नवा पाहुणा येणार असल्याने घरात आनंदाचे वातावरण होते. नवनीतला प्रसूतीकळा सुरू झाल्याने तिला मेरठमधल्या मवाना इथल्या केजेके रुग्णालयात दाखल करण्यात आले; पण सर्जरीदरम्यान नवनीतचा मृत्यू झाला. अतिरक्तस्राव झाल्याने नवनीतचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरने तिचा पती आणि कुटुंबीयांना सांगितले. नवनीतच्या मृत्यूने संदीपच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

नवनीतच्या मृत्यूने संदीप पार खचला. जड अंतकरणाने त्याने नवनीतच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार केले. अस्थी विसर्जनासाठी संदीप दुसऱ्या दिवशी मृतदेहाची राख आणण्यासाठी स्मशानभूमीत गेला. राख गोळा करत असताना राखेतून त्याला एक अशी वस्तू सापडली, जी पाहून त्याला धक्का बसला. राखेत त्याला चक्क सर्जिकल ब्लेड सापडले. रुग्णालयात ऑपरेशनसाठी सर्जिकल ब्लेडचा वापर केला जातो. पत्नी नवनीतच्या शस्त्रक्रियेदरम्यान सर्जिकल ब्लेड तिच्या पोटातच राहिले. त्यामुळे नवनीतचा मृत्यू झाल्याचा आरोप संदीप आणि त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे.

मृतदेहाच्या राखेत सर्जिकल ब्लेड सापडल्याने संदीपने रुग्णालय आणि शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केली आहे. संदीप आणि त्याच्या कुटुंबीयांनी मुख्यमंत्री कार्यालयाताही याबाबत तक्रार दाखल केली आहे. मेरठच्या मुख्य अधिकाऱ्यांनी घटना समोर आल्यानंतर रुग्णालयाचा परवाना रद्द करून चौकशीचे आदेश दिले आहेत. यासाठी एक समिती गठित करण्यात आली आहे.

न्यायाधीशांची अवमानास्पद टिप्पणी

भारतात न्यायालयीन कामकाजाची व्हिडीओग्राफी केली जाते. अनेकवेळा या न्यायालयाच्या कामकाजात अनेक न्यायमूर्ती असे बोलतात, की जे त्यांच्या पदाच्या प्रतिष्ठेला शोभत नाही. काही दिवसांपूर्वीच कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीशानंद यांनी बेंगळुरूच्या एका भागाचा उल्लेख 'मिनी पाकिस्तान'असा केला. त्यावरून त्यांच्यावर बरीच टीका होत असतानाच आता न्यायमूर्ती श्रीशानंद यांनी आणखी एक वादग्रस्त विधान केले आहे. या वेळी त्यांनी अंतर्वस्त्राबाबत महिला वकिलाला कमेंट केली आहे.

काही काळापूर्वी कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती वेदव्यासचार श्रीशानंद यांनी पश्चिम बंगळुरूमधील एका क्षेत्राला 'मिनी पाकिस्तान' म्हटले होते. त्यांचा हा व्हिडीओ 'सोशल मीडिया'वर व्हायरल झाला होता. त्यानंतर न्यायमूर्ती श्रीशानंद यांचा आणखी एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागला आहे. त्यांनी महिला वकिलाला असंवेदनशील आणि आक्षेपार्ह गोष्टी सांगितल्या. दुसऱ्या महिला वकिलाने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिल्याने न्यायमूर्ती श्रीशानंद यांनी उच्च न्यायालयातील महिला वकिलाला फटकारले. आपले मत मांडताना त्यांनी न्यायमूर्तीच्या प्रतिष्ठेचा अवमान केला. न्यायमूर्ती श्रीशानंद यांनी महिला वकिलाला सांगितले, की तिला विरोधी वकिलाबद्दल बरेच काही माहीत आहे आणि पुढच्या वेळी ती त्यांच्या अंतर्वस्त्रांचा रंगदेखील सांगू शकते. कर्नाटक उच्च न्यायालयात एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान हा संपूर्ण प्रकार घडला. न्यायमूर्ती श्रीशानंद यांच्या या असंवेदनशील आणि वादग्रस्त टिप्पणीवर अनेक जण नाराजी व्यक्त करत आहेत. हा व्हिडीओही 'सोशल मीडिया'वर चांगलाच व्हायरल होत आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्रीशानंद यांच्या या आक्षेपार्ह टिप्पणीवर अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रसिद्ध वकील इंदिरा जय सिंह यांनी या प्रकरणाचा व्हिडीओ शेअर करताना लिहिले, की आम्ही भारताच्या सरन्यायाधीशांना विनंती करतो, की त्यांनी या न्यायमूर्तीविरुद्ध स्वतःहून कारवाई करावी आणि त्याला लैंगिक संवेदना प्रशिक्षणासाठी पाठवावे. आता सर्वोच्च न्यायालयाने कर्नाटक उच्च न्यायालयाकडून म्हणणे मागितले आहे.

'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है।

''माझे हृदय कमळाने भरले आहे''

समवसरणमध्ये विराजित देवाधिदेव तीर्थंकर प्रभूचे दिव्यातिदिव्य अष्टमहाप्रातिहार्यांचा वर्णन करून झाल्यानंतर आचार्य श्री मानतुंग देव प्रभुंची विहारचर्याचा दिग्दर्शन त्यांनी आपल्या नेत्राने केले आहे. तिन्ही लोकांचे राज्यकर्ते लोकांच्या उद्धारासाठी एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात फिरत राहतात. वाहणारा प्रवाह ज्याप्रमाणे पायदळांची तहान भागवतो, त्याचप्रमाणे महापुरुषांची गतिशीलता सजीवांना त्यांच्या सत्वाच्या उष्णतेपासून मुक्त करते. म्हणूनच असे म्हटले जाते की, ''विहार चारिया इसिनाम'' पाठ हा सजीवांच्या रक्षणासाठी आहे.

देवतादेखील परमेश्वराच्या आनंददायी भटकंतीत (विहार) महानता प्रकट करतात. भगवंत जेथे जेथे पाय ठेवतात तेथे देवता आपोआप त्यांच्या दैवी शक्तीने भक्तीतून हजार पाकळ्यांचे मऊ सोनेरी आबर्य निर्माण करतात. सोन्याच्या कमळाच्या तेजापेक्षा नखकंती मोठी आहे. भगवंताच्या सोनेरी देव शरीरातून असंख्य किरण बाहेर पडतात आणि जेव्हा कोणी एक पाऊल पुढे टाकते, तेव्हा असे दिसते की, नखकंती आणि कमळाच्या तेजामध्ये जणू स्पर्धा (होडा-होडी) आहे, कारण नखांची चमक ही नवीन सोन्याच्या कमळांच्या तेजासारखी आहे. जी प्रत्येक क्षणी विस्तारत आहे. ती फुललेली आहे, परंतु भगवंताने निर्माण केलेली ती सोन्याची कमळे उभी आहेत, ती भौतिक जडाच्या गढ्तघात तयार झाली आहेत.

भगवान जिथे पाय ठेवतात तिथे देव सात कमळ निर्माण करतात. परमेश्वरासमोर तीन पहाट, तीन इंद्र आणि मागे आणि एक परमेश्वराच्या पायाखाली, जलद गतीने काम करणारी ही देवता त्याच्या उत्कृष्ट भक्तीच्या शक्तीचा पुरावा आहे. जिनेन्द्र प्रभूंचा विहारचर्या हा सुद्धा नवोदित प्रवृत्ति आहे. ही प्रवृत्ति सुद्धा निवृत्तीमय होऊन, धर्म जीवांच्या निवृत्तीचा मार्ग दाखवणारा आहे.

भगवंताच्या चरणी पूर्णत्याग, योग्य चारित्र्य इत्यादी गुणांनी युक्त असल्याने सद्गुरु आत्मा त्या चरणांचा आश्रय घेऊन संसार पार करतो. चरण पूजनीय आहे. कारण ते उदात्त चारित्र्याचे प्रतीक आहे. ''अंगुष्ठे अमृत बसे''. पायच्या क्रमांकाच्या अंगठ्यामध्ये सुसंवाद आणि सद्गुणाचे अमृत वाहते. जो अमृत पितो त्याला असे घडते, त्याचा अमर आत्म-प्रेमळ आत्मा जागृत होतो. कमळाच्या चरणांची पूजा करणेच योग्य चारित्र्याची प्राप्ती होते. द्रव्यमावाचे चारित्र प्राप्त करण्याच्या तीव्र इच्छेने लोक भगवंताच्या चरणसेवेत तल्लीन झालेले दिसतात. देवांचा स्वामी इंद्र स्वतः परमेश्वराच्या चरणी सेवा करत असतो. महाविदेह प्रदेशात विहारमन सीमंधरस्वामी वीस तीर्थंकर प्रभू आपापल्या प्रांतात आपापल्या विजयात सतत फिरत असतात. ते बारा महिने प्रवास करतात. म्हणून त्यांना विहारमन म्हणतात. चातुर्मासकल्प हा भारत क्षेत्र आणि ऐरावत क्षेत्राच्या पहिल्या आणि शेवटच्या तीर्थंकराच्या कालात्तव होतो. मध्ययुगीन काळातील बावीस तीर्थंकरांनीही बारा महिने भटकंती केली.

❋ विहारचर्या संपुट :- अहो तिन्नाणं तारियाणं, बुद्धाणं बोहियाणं मुतांणं मोयगाणं प्रभो! आपली प्रशस्त विहार चर्या वस्तुतः कल्याणकारी मंगलकारी आहे. भक्त देवाला म्हणतो की, तू पाच फिरत्या सूर्यासारखा आहेस. देव सोन्याच्या कमळांवर श्लोक जपताना तू पूडे जाशील का? ते जगाचे कमळ आहे पण माझे पिण्याचे कमळ सतत आनंदी भावनेने फुलत असते. आनंदमय भक्तीने फुललेले माझे महान हृदयाचे कमळ तुमच्या चरणी समर्पित.

❋ गाथा ❋ (३६)

उन्द्रिद – हेम – नव – पंकज – पुळ – कान्ती
पर्युंल्ल – सन्नख – मयूख – शिरवाभिरामौ ।
पादौ पदानि तव यत्र जिनेन्द्र ! धत्तः
पदमानि तत्र विबुधाः परिकल्पयन्ति ।३६।।

❋ अर्थ – हे जिनेद्रा, परमेश्वराचे विहारचार्य! नवीन विकसित झालेल्या सोन्याच्या कमळाप्रमाणे दिव्य तेज असलेले आणि सर्वत्र पसरलेल्या खिळ्या-किरणांच्या प्रकाशाने अत्यंत सुंदर दिसणारे तुमचे पावन चरण जेथे विसावतात, तेथे भक्त देवतांनी सुवर्ण कमळांची निर्मिती केली आहे.

❋ उत्तरध्याय सूत्र ❋

उत्तराध्याय सुत्राच्या **नवव्या अध्ययनात** :- नमिराजार्षि याचा उल्लेख आला आहे. नमि राजाची परीक्षी घेण्यासाठी शकेन्द्र ब्राह्मण स्वरूपात वेतात व प्रश्न विचारतात. राजा उत्तर देताना म्हणतात, काम भोग त्याज्य वर्जित आहे. त्याचे सेवन कस नये. जे सेवन करता ते दुर्गुत्ति जातात.

❋ दहाव्या अध्ययनात :- भगवान महावीर स्वामींनी गौतम स्वामी ना छत्तीस (३६) वेळा संबोधीत केले, कि क्षणाचाही गर्व करू नये. जे मनुष्य जन्म मिळाले ते सुईच्या टोकासारखे बिंदुसमान आहे.

❋ अकराव्या अध्ययनात :- (बहुस्सुय) बहुश्रुत म्हणजे अनेक शास्त्रात पारंगत आहे. त्या व्यक्तीना बहुश्रुत म्हटले जाहे. ज्ञान हे अमृत आहे, तर अज्ञान विष आहे.

– सौ. सविता चोरडिया

जिल्ह्यात विधानसभा निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासन सज्ज

नगर – विधानसभा निवडणुकीसाठी नगर जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. जिल्ह्यात विधानसभेसाठी २० नोव्हेंबरला मतदान प्रक्रिया होणार असून त्यानंतर २३ तारखेला मतमोजणी होणार आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी मंगळवारी पत्रकार परिषद घेऊन विधानसभा निवडणुकीच्या तयारीची माहिती दिली.

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर नगरला झालेल्या पत्रकार परिषदेला जिल्हाधिकारी सालीमठ, पोलिस अधीक्षक राकेश ओला, निवडणूक उपजिल्हाधिकारी राहुल पाटील, नायब तहसीलदार प्रशांत गोसावी, शंकर रोडे आदी उपस्थित होते. जिल्ह्यात १२ मतदारसंघांत ३७ लाख ६० हजार ५१२ मतदार असून ३ हजार ७६३ मतदान केंद्र आहेत. निवडणुकीसाठी २२ ऑक्टोबरला निवडणूक अधिसूचना जाहीर होणार आहे. दरम्यान, जिल्ह्यात मंगळवारपासून (दि.१५) ते मतदान प्रक्रिया होवून मतमोजणी प्रक्रिया (दि. २३ नोव्हेंबर होईपर्यंत) ४० दिवसांची आचारसंहिता राहणार आहे.

विधानसभा निवडणुकीची अधिसूचना जाहीर झाल्यानंतर उमेदवारी दाखल करणे, दाखल अर्जाची छाननी, माघार, प्रत्यक्षात मतदान तसेच त्यानंतर मतमोजणी प्रक्रिया होणार असल्याचे जिल्हाधिकारी सालीमठ यांनी यावेळी सांगितले. जिल्ह्यात विधानसभेचे १२ मतदारसंघ असून त्याठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच निवडणुकीसाठी आवश्यक असणार्या कर्मचाऱ्यांना येत्या दोन दिवसात नेमणुकीचे आदेश देण्यात येणार आहेत. जिल्ह्यात ९८ ते ९९ हजार कर्मचार्यासह दहा टक्के राखीव कर्मचार्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. या कर्मचार्यांना २७ किंवा २८ तारखेला निवडणुकीचे प्रथम प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान अधिकार्यासह पाच कर्मचारी आणि एक पोलीस कर्मचारी नेमण्यात येणार आहे.

५० टक्के मतदान केंद्रावर वेब कास्टिंग

जिल्ह्यात १२ मतदान मतदारसंघात ३ हजार ७६३ मतदान केंद्र असून लोकसभा निवडणुकीत ज्या मतदान केंद्रांवर मतदानासाठी गर्दी झाली होती असे मतदान केंद्रावर मतदारांसाठी 'आनंददायी' मतदान केंद्र उभारण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येणार आहे. मतदानाच्यावेळी जिल्ह्यात एकूण असणार्या मतदान केंद्रापैकी ५० टक्के म्हणजेच १ हजार ८८४ मतदान केंद्रावर वेब कास्टिंग करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. मतदानासाठी जाणे अशक्य नसणार्या ८५ वर्षावरील अथवा ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असणार्या, तसेच कोविड बाधित रूग्णांना घरुन मतदानाची सोय करण्यात येणार आहे. जिल्ह्यात ८५ वर्षे पेक्षा अधिक वय असणारे ५५ हजार मतदार आहे. यांनी मागणी केल्यास त्यांना घरून मतदानाची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

योजनांचे शासकीय फलक तातडीने काढणार

जिल्ह्यात मंगळवारी सायंकाळपासून विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली असून येत्या २४ तासात शासकीय कार्यालयातील योजनांचे शासकीय फलक, तसेच ४८ ते ७२ तासात निमशासकीय कार्यावरील योजनांचे फलक काढण्यात येणार आहे. तसेच निवडणूक लढवणार्या उमेदवारांना आणि राजकीय पक्षांना त्यांच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्यांची माहिती तीन वेळा मतदारांना द्यावी लागणार आहे.

पोलिसांची प्रत्येक गोष्टीवर राहणार नजर : पोलीस अधीक्षक राकेश ओला

लोकसभा निवडणूकीत पोलिसांनी पकडलेल्या लाखो रूपयांची रक्कमेचा तपास सुरू असून याबाबतची माहिती आयकर खात्याला कळविण्यात आलेली आहे. निवडणुकीसाठी पोलीस प्रशासनाची कायदा सुव्यवस्थेची पहिली बैठक झालेली असून लवकरच पुढील नियोजन करण्यात येणार आहे. लोकसभा निवडणुकीत दाखल गुन्हानुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून रेकॉर्डवरील आरोपींचा शोध सुरू आहे. जिल्ह्यात निवडणूक काळात अवैध दारू शस्त्रे, तसेच बेकायदा पैशाची वाहतूक करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यात येणार असून यासाठी आजपासून विधानसभानिहाय भरारी पथके कार्यरत झाली आहेत. निवडणूक काळात पोलीस प्रशासन प्रत्येक गोष्टीवर करडी नजर ठेवणार आहे. यासाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सहा पथके कार्यरत राहणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी दिली. तसेच जिल्ह्यातील गुन्हेगार यांच्यावर करण्यात आलेल्या प्रतिबंधक कारवाई यासह पुढील काळात करण्यात येणाऱ्या विविध उपायोजना यांची माहिती दिली.

निवडणूक आयोगाच्या रेकॉर्डला अहमदनगरच नाव

केंद्र आणि राज्य सरकारने अहमदनगरचे नाव अहिल्यानगर असे केले असले तरी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या अधिसूचनेत नगर जिल्ह्याचे नाव अहमदनगर असेच आहे. यामुळे निवडणूक काळात नगरची माहिती सर्व अहमदनगर या नावाने प्रसिध्द होणार असल्याचे जिल्हाधिकारी सालीमठ यांनी सांगितले. निवडणूक आयोगाच्या रेकॉर्डला जिल्हा आणि शहर मतदारसंघाचे नाव अहमदनगर असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

१५ हजार जणांवर प्रतिबंधक कारवाई

आगामी विधानभेच्या पार्श्वभूमीवर जिल्हातील पोलीस ठाणे हद्दीतील सुमारे १५ हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी दिला आहे. तसेच काहीजणांवर तडीपारीचे प्रस्ताव पाठविण्यात आले आहे. तर काहींवर तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे. निवडणूक काळात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी जिल्ह्यात गुन्हेगार यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

आदर्श, महिला, युवक व दिव्यांग मतदान केंद्र

जिल्ह्यात नियमित मतदान केंद्रास ३६ आदर्श, १२ महिला संचलित १२ दिव्यांग, १२ युवा आणि १४४० पडदानशील (मुस्लीम महिलांचे) मतदान केंद्र आहेत. यात सर्वाधिक पडदाशीन नेवासा तालुक्यात २० असून सर्वात कमी कर्जत-जामखेड तालुक्यात अवघे २ आहेत. यासह प्रत्येक तालुक्यात ३ याप्रमाणे नगर जिल्ह्यात ३६ आदर्श मतदान केंद्र राहणार आहेत. जिल्ह्यात प्रत्येक मतदारसंघात जिल्हाधिकारी प्रत्येकी एक स्वतंत्र मतदान केंद्र राहणार आहेत. तर प्रत्येक ठिकाणी खास युवकांसाठी युवक संचलित मतदान केंद्र राहणार आहेत.

विधानसभा मतदारसंघनिहाय मतदार

शेवगाव-पाथर्डी मतदारसंघात १ लाख ९३ हजार ८७६ पुरुष आणि १ लाख ७८ हजार ५९४ महिला असे सर्वाधिक ३ लाख ७२ जार ४७६ हजार ७४३ मतदार आहेत. अकोले विधानसभा मतदारसंघात १ लाख ३८ हजार ८४५ पुरुष, १ लाख २७ हजार २८३ महिला असे २ लाख ६६ हजार १२९ मतदार आहेत. संगमनेरमध्ये १ लाख ४७ हजार ४६९ पुरुष, १ लाख ३९ हजार ७५७ महिला असे २ लाख ८७ हजार २२७ मतदार आहेत. शिर्डीमध्ये १ लाख ४८ हजार ४२५ पुरुष, १ लाख ४२ हजार ३५७ महिला, असे २ लाख ९० हजार ७९० मतदार आहेत. कोपरगावमध्ये १ लाख ४५ हजार ८३४ पुरुष, १ लाख ४२ हजार ५७१ महिला असे २ लाख ८८ हजार ४१९ मतदार आहेत. श्रीरामपुरमध्ये १ लाख ५५ हजार १३९ पुरुष, १ लाख १५२ हजार ५१२ महिला असे ३ लाख ७ हजार ७५३ मतदार आहेत. नेवासामध्ये १ लाख ४४ हजार ९९३ पुरुष, १ लाख ३५ हजार ८९९ महिला असे २ लाख ८० हजार ८९६ मतदार आहेत. राहुरीमध्ये १ लाख ६६ हजार ७६२ पुरुष, १ लाख ५४ हजार ३२५ महिला असे ३ लाख २१ हजार ८८ मतदार आहेत. पारनेरमध्ये १ लाख ७९ हजार ७६८ पुरुष, १ लाख ६८ हजार ८०२ महिला असे ३ लाख ४८ हजार ५७३ मतदार आहेत. नगर शहरमध्ये १ लाख ६९ हजार ७२४ पुरुष, १ लाख ५४ हजार ७४८ महिला असे ३ लाख १४ हजार ५७९ मतदार आहेत. श्रीगोंदामध्ये १ लाख ७५ हजार ४६७ पुरुष, १ लाख ६१ हजार ९२६ महिला असे ३ लाख ३७ हजार ३९५ मतदार आहेत तर कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघामध्ये १ लाख ८० हजार ५९८ पुरुष, १ लाख ६४ हजार ५९७ महिला असे ३ लाख ४५ हजार १९५ मतदार आहेत.

निवडणुकीसाठी विविध समित्या

जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून यात माध्यम प्रामाणिकरण व सनियंत्रण समितीसह अचारसंहिता लागू झाल्यापासून निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत कायदेशीर प्रक्रिया राबवून जप्त करण्यात येणारे पैसे, मौल्यवान वस्तू यांची चौकशी करून निवडणूक प्रकियेशी संबंध नसल्यास ती परत करण्यासाठी समितीचा समावेश आहे. या समित्यामध्ये जिल्हाधिकारी सालीमठ यांच्यासह जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी राकेश ओला, सर्व विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी, सायबर सेलचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्यासह अन्य अधिकारी यांच्या समावेश आहे.

१२ मतदारसंघांत ३७ लाख ६० हजार ५१२ मतदार, ३ हजार ७६३ मतदान केंद्र

विधानसभा निवडणुकीत राजकीय पक्षांना आवश्यक परवानग्यासाठी सुविधा कक्ष

नगर – विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी विविध राजकीय पक्षांना आवश्यक असणाऱ्या विविध परवानग्या विहित वेळेत मिळाव्यात यासाठी सुविधा कक्षाची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिली आहे.

प्रचार फेरी, जाहीर सभा, चौक सभा यासह सर्व प्रकारच्या सभा, तहसिल अंतर्गत सभा व रॅलीची परवानगी संबंधित पोलीस निरीक्षक यांच्याकडून प्राप्त होणार आहे. परवानगीसाठी अर्ज व डी-१ नमूनाचा अतिरिक्त माहिती, नगरपालिका/महानगरपालिकेचे जाहिरात लावण्याचे शुल्क व ना हरकत दाखला तसेच अनूसूची १६ आवश्यक आहे.

सभेच्या ठिकाणी पोस्टर्स, झेंडे, कापडी बॅनर्स लावण्यासाठी महानगरपालिका, नगर परिषद, नगरपालिका व ग्रामपंचायत यांच्याकडून परवानगी देण्यात येणार आहे. परवानगीसाठीच्या अर्जासोबत खाजगी जागा असल्यास मालकाचे संमतीपत्र व महानगरपालिका, नगरपालिकेची जागा असल्यास परवानगी शुल्क भरल्याचा पुरावा आदी कागदपत्रे आवश्यक आहेत.

खाजगी जागेतील जाहिरात फलकावर प्रचार साहित्य लावण्यायी परवानगी महापालिका, नगर परिषद, नगरपालिका व ग्रामपंचायत कार्यालयाकडून देण्यात येणार आहे. यासाठी अर्जसोबत मालकाचे संमतीपत्र, स्थानिक स्वराज्य संस्थेची जागा परवान शुल्क भरल्याचा पुरावा तसेच पोलीस ना हरकत दाखला जोडणे आवश्यक आहे.

विधानसभा मतदारसंघ कार्यक्षेत्रात (पांढरा रंग) प्रचार वाहनाची परवानगी संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून देण्यात येणार आहे. यासाठी अर्ज, आर. सी. बुक, वाहनाचा इन्शुरन्स असल्याचा पुरावा, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची परवानगी, पोलीसांकडील नाहरकत दाखला, वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र, टॅक्स भरल्याची पावती, व्यावसायिक वाहन असल्यास वैध परवाना, चालकाचा परवाना, पीयूसी तसेच वाहनाच्या चारही बाजूचा फोटो आवश्यक आहे.

उमेदवाराच्या तात्पुरत्या प्रचार कार्यालयाची परवानगी संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून देण्यात येणार आहे. यासाठी करावयाच्या अर्जासोबत खाजगी जागा असल्यास जागा मालकाचे संमतीपत्र, स्थानिक स्वराज्य संस्था जागा परवाना शुल्क तसेच पोलीसांचा ना हरकत दाखला आवश्यक आहे.

हेलिपॅड व हेलिकॉप्टर उतरविण्यासाठीची परवानगी अपर जिल्हादंडाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडून देण्यात येणार आहे. यासाठी अर्ज करतांना पोलीस अधीक्षक, महानगरपालिका/नगरपालिका/ ग्रामपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अग्निशामक दलाचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच रुग्णवाहिकेबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

सभेसाठी ध्वनिक्षेपकाची परवानगी पोलीस विभाग, तर वाहनासाठी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची परवानगी दिल्यावर पोलीस निरीक्षक परवानगी देतील. यासाठी अर्जासोबत वाहनांसाठीचे प्रादेशिक परिवहन अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

शाळेच्या मैदानावर सभा घेण्यासाठीची परवानगी उप विभागीय दंडाधिकारी यांच्यामार्फत देण्यात येणार आहे. यासाठी अर्ज, शाळा व्यवस्थापन, शिक्षणाधिकारी, स्थानिक प्राधिकरण, आणि पोलीसांच्या नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सोशल मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया, प्रिंट मिडियावर प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क, एसएमएससाठी माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती यांच्याकडे विहित नमुन्यात अर्ज व दोन प्रतीत जाहिरातीची संहिता तसेच निर्मिती (दोन प्रतीत पेन ड्राईव्ह किंवा सीडीमध्ये) जिल्हास्तरीय समितीकडे जिल्हाधिकारी कार्यालयातील माध्यम कक्षात सादर करावा.

श्री संतांजी महाराज जगनाडे आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केल्याबद्दल नगर येथे तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने संतांजी भवन येथे जल्लोष करून मिठाई वाटप करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिक विजय दळवी, रमेश सांळुखे, ह.भ.प. रामदास महाराज शिरसागर, ट्रस्टचे अध्यक्ष प्रसाद शिंदे, उपाध्यक्ष मनोज शिरसागर, सचिव शोभना धारक, खजिनदार प्रकाश सैंदर, गोकुळ कोटकर, सागर काळे, शशिकांत देवकर, दत्तात्रय ढोळसे, सौ.निता लोखंडे, गणेश दहितुले, सुहास दळवी, योगेश भागवत, गणेश धारक आदी.

नगरच्या अप्पर जिल्हाधिकारी प्रवीण महाजन

नगर – नंदूरबार येथील सरदार सरोवर प्रकल्पाचे अप्पर जिल्हाधिकारी प्रवीण चुडामण महाजन यांची अहिल्यानगरच्या अप्पर जिल्हाधिकारीपदी बदली तर महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलसचिव अरुण बाबुराव आनंदकर यांची बदली नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयात अप्पर आयुक्तपदी झाली आहे.

राज्य शासनाने मंगळवारी (दि.१५) सात अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. अहिल्यानगरचे अप्पर जिल्हाधिकारी सुहास मापारी यांची काही दिवसांपूर्वीच पुणे येथील अप्पर जिल्हाधिकारी अजय मोरे यांच्या जागी बदली झाली होती. नियुक्तिच्या प्रतीक्षेत असलेले अजय मोरे यांची आता नाशिक येथे अप्पर विभागीय आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. मोरे यांनी यापूर्वी अहिल्यानगर येथे महसूल उपजिल्हाधिकारी व भूसंपादन अधिकारी म्हणून काम केले आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या जिल्हाध्यक्षपदी अशोक सावंत

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे नगर दक्षिण जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहाटा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर या पदावर आता पारनेरचे अशोक सावंत यांची वर्णी लागली आहे. प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी बुधवारी (दि.१६) मुंबईत सावंत यांना निवडीचे पत्र दिले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दक्षिण जिल्हाध्यक्षपदी पारनेरचे जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र लोकसभा निवडणुकीपूर्वी या पदावर श्रीगोंद येथील बाळासाहेब नाहाटा यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु नाहाटा यांनी अनेक जबाबदाऱ्या असल्याने या पदाला न्याय देता येत नसल्याचे कारण देत मागील महिन्यात आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. तेव्हापासून जिल्हाध्यक्षपद रिक्त होते. या पदावर बुधवारी अशोक सावंत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अशोक सावंत हे उभयपक्षयंत्री अजित पवार यांचे निकटवर्तीय असून पारनेर तालुक्यातील संत निळोबाराय देवस्थान, पिंपळनेरचे कार्याध्यक्ष आहेत. त्यांनी यापूर्वी राज्यमंत्री दर्जा असलेले पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाचे अध्यक्षपद भूषविलेले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य बुंदेला चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

विकासकामांसह धार्मिक स्थळांसाठी मोठा निधी उपलब्ध केला

नगर – शहराच्या विकास काम बरोबरच धार्मिक स्थळांचा विकास व्हावा यासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे या ठिकाणी नागरिक मोठ्या संख्येने एकत्रित येत आपले पारंपरिक सण उत्सव आणि धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे करीत असतात. आनंदऋषी महाराज यांचे समाधी स्थळ आपल्या शहरात असून देशभरातून भाविक भक्त मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात त्यामुळे समाधीस्थळ परिसराचा विकास व्हावा यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून मोठा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे या परिसराला सुशोभीकरणाचे रूप प्राप्त झाले आहे, केडगाव येथील जैन स्थानक परिसराचा विकास व्हावा त्यासाठी मोठे निधी उपलब्ध करून दिला आहे, केडगाव उपनगराचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी माझे प्रयत्न सुरू असल्याचे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले

आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; केडगाव येथील जैन धर्मस्थानक परिसरातील सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन

केडगाव येथील जैन धर्मस्थानक परिसरातील सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन करताना आ. संग्राम जगताप. (छाया – लहू दळवी)

केडगाव येथील जैन धर्मस्थानक परिसरातील सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी नगरसेवक विपुल शेटिया, केडगाव जैन श्रावक संघाचे अध्यक्ष पन्नालाल बोकरिया, ओस्तवाल सर, राजेंद्र मुनोत, बाबूलाल चोरडिया, संजय संचेती, सोहन बरमेचा, कमलेश गुंदेचा, संतोष शेटिया, धीरज चोरडिया, मुकेश बरमेचा, धीरज बरमेचा, विपुल कांकरिया, रूपेश गुगळे, किरण सुराणा, सचिन पोखर्णा, पारस शेटिया, जिनेश मालू, राहुल शेटिया, मयूर चोरडीया,रमेश मुनोत, निखिल संचेती, उमेश बलदोटा, सुशील फिरोदिया, कमलेश फिरोदिया, सचित संचेती, राजू भंडारी, भरत भंडारी, महावीर भंडारी, तेजस संचेती, प्रितेश बाफना उपस्थित होते.

पन्नालाल बोकरिया म्हणाले की, केडगाव उपनगरामध्ये जैन बांधव मोठ्या संख्येने राहत असून त्यांना धार्मिक कार्यक्रमाशाठी जैन स्थानकाची निर्मिती केली या परिसराचे सुशोभीकरणाचे काम मार्गी लागावे यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे पाठपुरावा केला आणि त्यांनी तातडीने निधी उपलब्ध करून दिला असल्यामुळे जैन स्थानक परिसराला सौंदर्यकरणाचे रूप प्राप्त होईल असे ते म्हणाले.

दुकान भाड्याने देणे आहे

क्लिनीकसाठी सेटअप आहे.
१५० चौ.मी. व पुढे मोकळी शेड
कर्दीकर हॉस्पिटल रोड, सिद्धार्थनगर
9870236270

हॉल भाड्याने देणे

तेलीखुंट भागात ३५० स्क्वे.फूट हॉल भाड्याने देणे आहे.
Prof.Rajesh Misal B.E.(Mech.)
बाळ प्रकाश टेलर्स बाजारी, लोहार गल्ली, तेलीखुंट, अ.नगर
9890664006

टि.व्ही. सेंटर चौकात, सावेडी येथे रोडटच २०० स्क्वे.फु. गाळा भाड्याने देणे

7057953250

रो-हाऊस विकणे/भाड्याने देणे

१. सौरभ कॉम्प्लेक्स
२. रविश कॉलनी, कायनेटिक चौक
9623688384

बाळाला सांभाळण्यासाठी महिला पाहिजे

९ महिन्याच्या बाळाला सांभाळण्यासाठी महिला पाहिजे. घराजवळ राहणारीला प्राधान्य.
प्रेमदान चौक सावेडी
7218880037

अकौंटंट पाहिजे

1. Junior Accountant (B.com)
2. Supervisor (Graduate)
Address:- Savedi, Ahmednagar
Contact details
Email ID:- sarangmilk9@gmail.com
आकर्षक पगार दिले जाईल.
Contact : 8975999272, 7030676870

वॉचमन फॅमिली पाहिजेत

वृंदावन रेसिडेन्सी, गावडेमळा, इस्कॉन मंदिराजवळ, पाईपलाईन रोड, अहमदनगर. राहणे फ्री आहे.अपार्टमेंटची कामे करावी लागतील. आकर्षक पगार
9270707084

पाहिजेत

रजिस्टर फार्मासिस्ट
भालवणी येथील सत्यम मेडिकलसाठी पूर्ण वेळ रजिस्टर फार्मासिस्ट पाहिजे आकर्षक पगार
9420747475

नामांकित टाईल्स्च्या शोरूमसाठी अकौंटंट पाहिजे

टॅलीचे ४ ते ५ वर्षाचा काम केल्याचा अनुभव आवश्यक
लेडिज/जेन्स्स्
Excel व Tally चे ज्ञान असणाऱ्यांचीच संपर्क साधावा (अनुभवीस आकर्षक पगार)
ही-मार्ट जंक्शन, नगर-मनमाड रोड, सावेडी
9590151515

लिव्ह ॲण्ड लाईन्सस तत्वावर गाळा देणे आहे

अहमदनगर यतीमखाना ॲण्ड बोर्डींग, अहमदनगर रजि.नं. बी.२२३ या संस्थेच्या मालकीचे असलेले अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सि.स.नं.५१६१ च्या एकूण क्षेत्र ३६६.२ चौ.मी. या मिळकतीवरील बांधकाम केलेले इमारतीतील दुकान नं.८ चे क्षेत्र पूर्व-पश्चिम-९.५ फूट व दक्षिण-उत्तर १६.५ फूट या चतुर्थसिमा असलेला गाळा लिव्ह ॲण्ड लाईन्सस तत्वावर देणे आहे. योग्य ती अनामत रक्कम व मासिक फी देणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल. इच्छुक असलेल्या व्यक्तीने जुनी महानगरपालिका कार्यालयासमोर, संस्थेच्या ऑफिसमधील पत्र पेटीमध्ये बंद लिफाफे निविदा दि.१६/१०/२०२४ पासून २१/१०/२०२४ पर्यंत सादर करावी.

चेअरमन
अहमदनगर यतीमखाना ॲण्ड बोर्डींग, अहमदनगर
संपर्क : फोन - 0241-2345897 (ऑफिस)
मो : 9970536576 (सय्यद फारुक)

बजाज माल वाहतूक रिक्षा विकणे आहे

GC. 1000
9763088758

वाळकी, ता. नगर येथील भारत पेट्रोलियमचा पेट्रोल पंप भाडे तत्वावर चालविण्यास देणे आहे

9421588875
9075516755

१३०० स्क्वे.फूट गाळा भाड्याने देणे आहे

मार्केटयार्ड येथे सर्वसोयींनीयुक्त पहिल्या मजल्यावर १३०० स्क्वे. फूट गाळा, पतसंस्था, ऑफिसेस, दवाखाना,क्लासासाठी भाडेतत्वावर देणे आहे.
9890398098

डॉ.योगेश सिसोदिया (M.S.ORTHO)

गुडघेदुखी, सांध्याचे आजार, लिगामेंट व स्पोर्टस् इंज्युरी तज्ञ.
संलग्न हॉस्पिटल
संचेती हॉस्पिटल (पुणे) । साईदीप हॉस्पिटल (नगर) : दर शनिवारी
अहमदनगर क्लिनीक : साईदीप हॉस्पिटल
दर शनिवारी : वेळ सकाळी १० ते १२ (अपॉईंटमेंट साठी संपर्क)
9860267116 / 7387393683

पाहिजेत

सेल्समन - ५
हेल्पर - २
कॉम्पुटर ऑपरेटर - २
टॅलीचे ज्ञान आवश्यक (अनुभवींना प्राधान्य)
विठ्ठलराव काशिनाथ हिणगोणावकर
सराफबाजार, गंजबाजार, अहमदनगर
9850856868

पाहिजे

दुकान कामासाठी सेल्सगर्ल/सेल्समन
जागा : ५, आकर्षक पगार+कमिशन
अर्जासह समक्ष भेटा
सद्गुरू बॅग्स ॲण्ड उलन हाऊस
जैन स्थानकासमोर, नवीपेठ
9028538344

सेल्समन पाहिजेत

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टस विक्रीसाठी सेल्समनची गरज आहे. स्वत:ची टू व्हीलर आवश्यक. किमान २ वर्षाचा अनुभव असल्यास प्राध्यान्य. मानधन आणि इन्सेंटिव्ह मिळेल. कृपया इंटरव्ह्यूसाठी शुक्रवार १८ ऑक्टोबर १० ते ५ या वेळात यावे.
साई एजन्सी, स्वरा एन्टरप्राईजेस,
बोरकर हॉस्पिटल, विनायकनगर, मातरी सुखूली-रेना शोरूमच्या मागे, अहिल्यानगर.
9423011940

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, घाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तरुण मुद्दमेही व व्यसनाचियांच्या सेक्स समस्या

वाईट सवयीचे दुष्परिणाम / स्वप्नदोष / शीघ्रपात / शीघ्रपात / अतन्मान कमजोरी / सुक्ष्मशुक्री कमी / मुखरोग / खवखव / मधुमेहाचा / नामर्दाचा बीमारी
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
२७ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
ISO प्रमाणित प्राप्त सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहमदनगर
संपर्क: 94 22 23 90 13 • www.sextreatment.in

पाहिजेत

सिव्हिल इंजिनिअर जागा : २
साईट सुपरवायझर जागा : ३
8007200001

त्वरित पाहिजेत

गेल्या पंचवीस वर्षापासून अहिल्यानगर शहरात पर्यटन क्षेत्रात कार्यरत असलेल्या कंपनीत खालील जागा भरणे आहे
काऊंटर प्रतिनिधी : शैक्षणिक पात्रता : १२ वी पास, मराठी, हिंदी,इंग्रजी प्रपुल, संगणक ज्ञान आवश्यक.
अकौंटंट : शैक्षणिक पात्रता : बी.कॉम./एम.कॉम., टॅलीचे ज्ञान आवश्यक
इच्छुक उपेदवारांनी खालील पत्त्यावर समक्ष संपर्क साधावा
केसरीची अधिकृत एजन्सी
चैतन्य ट्रेंड्स व इन्शुरन्स
रेनबो हाऊस, सावेडी रोड,अहिल्यानगर मो. ९४२२२२२४३१

डॉ.अद्वैत गिते

MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

✻ डोकेदुखी, मायग्रेन ✻ फिटचे आजार, अपस्मार
✻ हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
✻ तोल जाणे ✻ व्हर्टिगो, चक्कर येणे ✻ अर्धांगवायू, पॅरेलीसीस ✻ विसराळूपणा ✻ थरथर सुटणे, पार्किन्सन
याबरील सर्व आजारांच्या निदानासाठी उपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निझोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
✻ सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
✻ सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर
रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

Green Library

EARTH'S Greenery for Every Space
Fresh Environment with Indoor Plants
Get a Plant Today!
- Potted Planters
- Premium Planters
- Garden Accessories
- Garden Furniture
- Garden Lightings

Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस

नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातून
दरमीज
नगर येथून स. ७,८,९ व दुपारी ५.०० ■ पुणे येथून स.११,१२,१ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक बेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
विकआप पॉईंट -पिंपरखाण चौक, झोपडी कॅन्टीन, ताकाडू,पिंपोरि, एज रॉयल चौक,शास्त्रीनगर चौक,केशव पुणे ट्रॉव्ह- सावेडी, बुरशी सायबाग,येवला, नवीन शिवाजीनगर बसस्टॅण्ड, बुकिंग आफरन्यक
अमर-प्रेम हॉलेटेल
अधिक- सिव्हलेंड,अ.नगर
9657746555/ 9226399555

८ मराठी चित्रपट

दिनांक : १० ऑक्टो. ते १७ ऑक्टो. 2024

एक नंबर	जीगरा	विकी विद्या का वो वाला विडीओ	फुलवंती
AM 09:00 PM 01:45/06:45	AM 09:00 PM 02:00/ 05:00/ 10:30	AM 07:45/ 11:00 PM 01:40/ 03:00/ 11:00	PM 04:45
वेटायान	बडे भाई साहब-2	धर्मवीर-2	देवरा
AM 10:45 PM 07:30	AM 11:00	PM 04:15	PM 07:30

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
6353564618 / 7790094001

31 वा वर्धापनदिन

परिपूर्ण विश्वसनीय सेवा, हाच अमुल्य ठेवा
सर्वांचे मनासून आभार
आपला स्नेह, सहकार्य आणि विश्वासाच्या बळावर ३१ वा वर्धापन समारंभ साजरा करीत आहोत.
कोजागिरी पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!
गुगळे रद्दी डेपो
वेळ : सं ९ ३० ते रात्री ८ (बुधवार बंद)
गौरी घुमट, जय भवानी चौक, अहमदनगर.
Mo.: 9860413446 | 8793547690
रास्त भाव, अचुक माप
१५० किलोपर्यंत वजन एकाचवेळी
सर्व प्रकारची पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, लग्नपत्रिका, पोस्टकार्ड, स्वच्छ घुतलेल्या दुध पिशवी इ. खरेदी-विक्री सेवेचे विश्वसनीय दालन.

आपल्या हृदयाची काळजी कशी घ्याल ?

रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली
मोफत हृदयरोग तपासणी शिबीर
Cardic OPD मुलांच्या मोफत तपासणी
पुढील लक्षणे असणाऱ्या रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा.
छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे.
टाकळीढोकेश्वर येथे गुरुवार दि. १७ ऑक्टोबर २०२४ दुपारी १२.३० ते १.३०
साईसावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल
बाजार तळ, नगर रोड, टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अ.नगर.
मो. 7020448374, 9011111633
अहमदनगर येथे गुरुवार दि. १७ ऑक्टोबर २०२४ दुपारी २.३० ते ३.३०
सिटी केअर हॉस्पिटल
तारकपुर बस स्टॅण्ड समोर, अ.नगर. फोन : २३२५६४८.
संतोष दसासे (सिनिअर मॅनेजर) 7385195962, 9209632502

ISO 9001 : 2015 Certified Mandar Mulay

शाळा/कॉलेजमध्ये आपल्या पाल्यांच्या सुरक्षेबाबत निश्चिंत व्हा...
98222 94622 | 94220 87757
Swami Vivekanand Chowk, Gujar Galli, Ahmednagar

हार्दिक अभिनंदन

आपल्या निवडीचा सार्थ अभिमान..!

चित्राताई वाघ | विक्रांत पाटील | बाबूसिंग राठोड
पोहरादेवी महंत

– शुभेच्छुक –
बाबासाहेब सानप
अध्यक्ष : अहमदनगर जिल्हा मोटारमालक कल्याणकारी समिती, अ.नगर
उपाध्यक्ष : भारतीय जनता पार्टी, शहर जिल्हा ।
मा.सदस्य जिल्हा नियोजन समिती.

REVOLUTION in animation world

graphic designing
web designing
2d & 3d animation
18 MONTH PROGRAM

COURSE HIGHLIGHTS:
Complete 3D Animation career program
Industry visits & workshops
Making a portfolio after every Module
E-Projects

CERTIFICATE COURSE IN SOFTWARE PROGRAMMING
C Programming
C++ Programming
Data Structure, PHP
Python, Java
.Net
Duration : 6 Months

Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 — 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, A.nagar — 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 — 7447761769
An ISO 9001:2015 Certified DISHA COMPUTER INSTITUTE